सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ०८ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३४२ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## ग्लोबल कोकण महोत्सव २०२५ | कोकण संस्कृती आणि विकासाची नवी दिशा!




मुंबई, ७ मार्च २०२५ – कोकण भूमी प्रतिष्ठान तर्फे आयोजित ग्लोबल कोकण महोत्सवाच्या पहिल्या दिवशी तब्बल २५,००० कोकणप्रेमींची उत्स्फूर्त उपस्थिती लक्षणीय ठरली. महोत्सवाचे उद्घाटन फलोत्पादन मंत्री मा. भारतशेठ गोगावले यांच्या हस्ते झाले. यावेळी गृहराज्यमंत्री योगेश कदम तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कोकणातील शंभरहून अधिक लोककलाकारांनी पारंपारिक आदिवासी नृत्य, लोकसंगीत आणि लोकनृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. रजनीश राणे आणि देवळेकर यांनी साकारलेले मराठी भाषेचे अभिजात दालन विशेष आकर्षण ठरले.

फलोत्पादन मंत्री मा. भारतशेठ गोगावले म्हणाले, ग्लोबल कोकण महोत्सव हे फक्त प्रदर्शन नसून कोकणच्या आर्थिक स्वयंपूर्णतेकडे नेणारी चळवळ आहे. गावागावात स्थानिकांनी उद्योग उभारावेत आणि कोकणचा विकास कोकणवासीयांच्याच हातून घडावा, हीच प्रेरणा आहे.

कोकण भूमी प्रतिष्ठानचे संस्थापक श्री. संजय यादवराव म्हणाले, या वर्षी ग्लोबल कोकणला लोकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जागतिक कोकण महोत्सवाचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे 'कोकण बिझनेस कॉन्क्लेव्ह' आणि स्टार्ट-अप कोकण – मेक इन कोकण. आम्ही कोकणातील तरुणांसाठी संधी निर्माण करत आहोत जे स्वतःचे व्यवसाय आणि उद्योग सुरू करण्यास इच्छुक आहेत. आम्ही त्यांना कृषी, पर्यावरण पर्यटन आणि मत्स्यपालन क्षेत्रातील तज्ञ प्रदान करणार आहोत जे योग्य मार्गदर्शन देऊ शकतील आणि व्यवसायाच्या यशाची खात्री करण्यासाठी एक परिपूर्ण रोडमॅप तयार करू शकतील.

यंदाच्या महोत्सवात १०० हून अधिक महिला बचत गटांनी दर्जेदार उत्पादने सादर केली, तर शंभरहून अधिक मराठी उद्योजकांनी आपले स्टार्टअप आणि प्रकल्प सादर केले.

यावर्षी महोत्सवात खास स्टार्टअप कोकण दालन आणि ग्लोबल कोकण उद्योग संमेलन भरवले होते. कोकणातले हुशार तरुण आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना घेऊन इथे आले. या तरुणांना उद्योगाच्या वाटचालीसाठी राहुल कॉलेज ऑफ एजुकेशन संस्था सीड फंडिंगपासून थेट आयपीओ पर्यंत पोहोचवणार आहे! 'स्टार्ट अप कोकण – मेक इन कोकण' ही संकल्पना म्हणजे फक्त प्रकल्प नव्हे, तर कोकणातल्या माणसांना आर्थिक स्वयंपूर्णतेकडे नेणारी चळवळ आहे. गावागावात स्थानिकांनी उद्योग उभारावेत, आणि कोकणचा विकास कोकणवासीयांच्याच हातून घडावा, हीच खरी प्रेरणा आहे.

आगामी आकर्षण – ओरिजिनल हापूस आंबा

मार्च महिन्यात देवगड येथील ओरिजिनल हापूस आंबा ग्लोबल कोकण महोत्सवाच्या माध्यमातून थेट ग्राहकांना उपलब्ध होणार असल्याची घोषणा करण्यात आली. ग्लोबल कोकण महोत्सव २०२५ हे कोकण संस्कृती, पर्यटन, जैवविविधता आणि औद्योगिक विकासाला चालना देणारे महत्त्वाचे व्यासपीठ ठरले आहे.

सह्याद्री पर्यटन आणि जैवविविधतेचे अनोखे प्रदर्शन

महाराष्ट्र शासनाच्या वनविभागाच्या मदतीने साकारण्यात आलेली सह्याद्री पर्यटन गॅलरी जैवविविधता आणि शाश्वत पर्यटनाची माहिती देणारी प्रमुख आकर्षण ठरली. बोरिवली नॅशनल पार्क आणि ठाणे डिव्हिजन वनविभागाच्या सहभागामुळे महोत्सवाला वेगळे वैशिष्ट्य प्राप्त झाले.

पायाभूत सुविधांचे प्रदर्शन

गडथ जिंदाल पोर्ट, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण, एमएसआरडीसी आणि सिडको यांच्या सहभागाने कोकणातील येणाऱ्या विमानतळ, महामार्ग आणि पोर्ट यांसारख्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांची माहिती देण्यात आली.

## अभाविप करणार महाविद्यालयातील अनुपस्थितीचे सर्वेक्षण

### महाविद्यालय परिसरात विद्यार्थी येतील तरच देशाची प्रगती होईल : अभाविप




छत्रपती संभाजीनगर – दिनांक ८ व ९ फेब्रुवारी २०२५ रोजी धर्माबाद येथे झालेल्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या प्रदेश कार्यकारिणी बैठकीत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीच्या विषयात सखोल चर्चा करण्यात आली व या अनुपस्थितीची कारणे शोधण्यासाठी सर्वेक्षण करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. हे सर्व्हेक्षण दिनांक ५ ते १५ मार्च दरम्यान होणार असून या सर्वेक्षणा दरम्यान खान्देश व मराठवाड्यामधील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (जळगाव), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ (छत्रपती संभाजीनगर), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ (नांदेड), डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (लोणेरे) व श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (मुंबई) अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य, संस्थाचालक, पालक तसेच विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाच्या अधिकारी यांच्याशी प्रश्नावलीद्वारे संवाद साधून अनुपस्थितीची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सर्वेक्षण अचूक व प्रभावशाली होण्यासाठी वर उल्लेख केलेल्या सर्व विद्यापीठाच्या परीक्षेत्रातील सर्व ११ जिल्ह्यातील १०१ तालुक्यात ४०० पेक्षा अधिक महाविद्यालयात अभाविप च्या ३८४ विद्यार्थी व कार्यकर्त्यांच्या द्वारे हे सर्व्हेक्षण होणार असून या सर्वांचे प्रशिक्षण जळगाव, बीड व नांदेड या तीन ठिकाणी पूर्ण करण्यात आला असल्याचे अभाविप प्रदेश अध्यक्ष प्रा. डॉ. सचिन कंदले यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले,यावेळी चिन्मय महाले,वैभवी ढिवरे उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रा. डॉ. कंदले म्हणाले की, महाविद्यालय परिसर हे शिक्षणाची गंगा असून विद्यार्थ्यांचे येथे भविष्य घडते. मात्र कोरोना महामारीच्या नंतर महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीचे प्रमाण वाढले असून ही भविष्यासाठी धोक्याची घंटा ठरेल. यावर जबाबदार विद्यार्थी संघटना म्हणून अभाविप देवगिरी प्रांताच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थी अनुपस्थितीचे सर्वेक्षण करणार असून पुन्हा नव्याने महाविद्यालय परिसर विद्यार्थ्यांनी गजबजून उठावे यासाठी अभाविप येणाऱ्या काळात काम करणार आहे.

अभाविप प्रदेश मंत्री कु. वैभवी ढिवरे म्हणाल्या की, महाविद्यालयातील अपुऱ्या सुविधा आणि शैक्षणिक संकुलाचे झालेले बाजारीकरण तसेच ऑनलाईन शिक्षणाचा उपलब्ध असलेला पर्याय यामुळे विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील अनुपस्थिती वाढल्याचे लक्षात येते. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची अनुपस्थिती ही शैक्षणिक क्षेत्रातील मोठी समस्या म्हणून पुढे येत आहे. यावर ठोस उपाय योजना करण्यात याव्या म्हणून अभाविप शैक्षणिक परिवाराशी संबंधित घटकांचे सर्वेक्षण करणार असून यावर केवळ प्रश्न चिन्ह उपस्थित न करता उत्तर बनून येणाऱ्या काळात काम करणार आहे तरी शैक्षणिक परिवारातील सर्व घटकांनी यामधे सहभागी होऊन सहकार्य करावे.

## लोहगाव परिसरात मेंढपाळ कुटुंबावर हल्ला सात जण जखमी; पाच लाखाचे सोने घेऊन चोरटे पसार

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ७ मार्च : पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याचे हद्दीतील लोहगाव शिवारात एका शेतात मुक्कामी थांबलेले बारामती तालुक्यातील चार मेंढपाळ कुटुंबावर दि ६ गुरुवार रोजी मध्यरात्री चोरट्यांनी धुमाकूळ घालत लाकडी दांडे, कुऱ्हाडीने सहा पुरुष,व दोन महिलांना जोरदार मारहाण करून सोने, चांदी रोख रक्कम ओरबाडून चोरटे पसार झाले यात दोन जण गंभीर जखमी झाले, या घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी जाऊन पाहणी केली, बारामती तालुक्यातील मुढाळ गावातील चार मेंढपाळ कुटुंब टाकळी पैठण येथून लोहगाव ते दिन्नापूर रोडवरील अजय दसपुते यांच्या शेती गट ५८ मधील शेतात दि ६ गुरुवार रोजी मेंढ्यांचा कळपासह थांबलेले होते, या कळपावर मध्यरात्री चोरट्यांचे टोळीने एका बाजूचे तार कंपण तोडून झोपलेल्या मेंढपाळावर अचानक लाकडी दांडे,कुराडीनी जोरदार मारहाण करत महिला, लहान मुलांचे अंगावरील पाच ते सात तोळे सोने चांदीचे दागिने रोख रक्कम ओरबाडून चोरटे पसार झाल्याची घटना घडली,या हल्ल्यात गुलाब टेगळे, अप्पासाहेब टेगळे,सोनबा हाके, सिताराम टेगळे, लक्ष्याबाई टेगळे,लिबाबाई टेगळे, जखमी तर हिरामण टेगळे, कांतीलाल टेगळे, हे गंभीर जखमींना छत्रपती संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालय दाखल करण्यात आले, या घटनेची माहिती पहाटे गणेश इथापे यांनी बिडकीन पोलिसांना माहिती देतात सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या सह पोलीस पथकसह अपर पोलीस अधीक्षक अन्नापुर्णा सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा नांगरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे, पोलीस उपनिरीक्षक मंजीत सिंग सेना,सुनील खरात, संतोष पाटील, गोपाल पाटील, विठ्ठल डोखे, संतोष इमाळ, संतोष तोडकर, सहाय्यक फौजदार सोमनाथ तांगडे, यांच्या पथकाने घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला व चोरट्याचा माग काढण्यासाठी पथक रवाना केले आहे, या मध्ये मक्का मर लागलेले भिमा टेगळे, आर्दीनी ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथे उपचार करण्यात आले आहे, या घटनेचा बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नूतन जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया रुजू



अहिल्यानगर, दि.७ – जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या बदलीमुळे रिक्त झालेल्या जागी शासनाने नव्याने नियुक्त केलेले जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आज रुजू झाले. प्रभारी जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी त्यांचे स्वागत केले व त्यांना पदभार सोपवला.

डॉ.आशिया हे २०१६ च्या तुकडीचे भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) अधिकारी आहेत. येथे रुजू होण्यापूर्वी ते यवतमाळ येथे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यापूर्वी डॉ. आशिया जळगाव येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, भिवंडी महानगरपालिकेचे आयुक्त, नाशिक जिल्ह्यातील कळवण येथे उपविभागीय अधिकारी म्हणून कार्यरत होते.

डॉ.आशिया यांच्या भारतीय प्रशासकीय सेवेची सुरुवात यवतमाळ जिल्ह्यातून झाली आहे. या सेवेत आल्यानंतर एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीत आर्णी येथे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, तहसीलदार व बाभुळगाव येथे गटविकास अधिकारी म्हणून त्यांनी काम केले आहे.






धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तलाठी महिलेस ३५०० लाच घेताना एसीबीच्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (ला.प्र.वि.) पथकाने धाराशीव जिल्ह्यातील लोहारा तालुक्यातील पेठसांगवी सज्जातील तलाठी अश्विनी बालाजी देवनाळे यांना ३५०० रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. तक्रारदाराने आपल्या वडिलांच्या नावे असलेली जमीन स्वतःच्या नावावर फेरफार करण्यासाठी अर्ज केला होता. या अर्जावर प्रक्रिया करण्यासाठी तलाठ्याने ८००० रुपयांची लाच मागितली होती. तडजोडीनंतर ही रक्कम ३५०० रुपये ठरली होती. तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधल्यानंतर आज (६ मार्च) सापळा रचण्यात आला. तलाठ्याने आपल्या कार्यालयात तक्रारदाराकडून पंचासमक्ष लाच स्वीकारली. त्याच वेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कारवाई करून तिला ताब्यात घेतले. लाचखोर महिलेकडून ३५०० रुपये लाच रक्कम, इतर २७६० रुपये रोख रक्कम,अंदाजे ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, सोनाटा कंपनीचे मनगटी घड्याळ, सॅमसंग मोबाईल आरोपीच्या घराची झडती सुरू असून तिचा मोबाईल पुढील तपासासाठी जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत पोलिस निरीक्षक विकास राठोड, पोलीस उपअधीक्षक सिध्दाराम म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार नेताजी अनपट, सिध्देश्वर तावसकर, जाकेर काझी यांनी सहभागी होते.



## संक्षिप्त वृत्त...

### मंत्री ॲड.आशिष शेलार आज जिल्ह्यात

**धाराशिव, दि.७ मार्च -**



माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार हे ८ मार्च रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे.त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. सकाळी ८.१० वाजता सोलापूर विमानतळ येथे आगमन व शासकीय वाहनाने तुळजापूरकडे प्रयाण करतील. सकाळी ९ वाजता तुळजापूर येथे आगमन, राखीव व श्री तुळजाभवानी देवीजींचे दर्शन घेतील. सकाळी १० वाजता तुळजापूर मंदिर प्रशासकीय कार्यालय येथे पुरातत्व विभागाची आढावा बैठक घेतील. सकाळी ११ वाजता तुळजापूर येथून शासकीय वाहनाने अक्कलकोटकडे प्रयाण करतील.

### हनुमान जयंती उत्सवाच्या अध्यक्षपदी पवार

**तुळजापूर, दि.७ मार्च -**

शहरात मोठ्या जल्लोषात साजरी होणारी सार्वजनिक हनुमान जयंती निमित्ताने बैठक पार पडली. या बैठकीत सर्वानुमते यंदाच्या जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सोमनाथ पवार यांच्या निवडीची घोषणा जय बजरंग जय वडार प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रावण पवार यांनी केली. तुळजापूर शहरात ६ मार्च रोजी सायंकाळी हनुमान जयंती निम्मित बैठकित विविध समिती पदाधिकारी निवडण्यात आले. यात उपाध्यक्षपदी बाळू शिंगे,कोषाध्यक्षपदी सनी इटकर,सचिन बनपट्टे, मिरवणूक प्रमुख म्हणून सुरज इटकर,लक्ष्मण शिंगे,बापू राधे पवार,तुकाराम देवकर, मशा काका पवार, चंद्रकांत पवार,श्रावण भापू पवार,रमा पवार,गोकुळ पवार यांची एकमताने निवड करण्यात आली. या बैठकीला प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रावण पवार, लक्ष्मण पवार, धर्मराज पवार आदी वडार बांधव यांच्या मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

### मिनी ट्रॅक्टर योजनेची संधी

**धाराशिव, दि.७ मार्च -**

अनुसूचित जाती व नवबौद्ध स्वयंसहायता बचत गटांसाठी मिनी ट्रॅक्टर व त्याच्या उपसाधनांच्या पुरवठा योजनेचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. इच्छुक बचत गटांनी २५ मार्चपर्यंत http://mto.mahasamajkalyan.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावेत,असे आवाहन समाज कल्याण विभागाने केले आहे. ऑनलाईन अर्जाची एक प्रत व आवश्यक कागदपत्रांची सत्यप्रत ३० मार्च २०२५ पर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय,धाराशिव येथे सादर करणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा,असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त बी.जी.अरवत यांनी केले आहे.

### अवैध मद्य विरोधी कारवाई

**धाराशिव, दि.७ मार्च -**

वरुडा पारधी पिडीजवळ बापू भगवान पवार यांचे शेतामध्ये अंदाजे १८ हजार किंमतीचे ४०० लिटर गुळमिश्रीत रासायनिक द्रव व ७० लिटर गवठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने ठेवल्याने गुन्हा दाखल केला आहे.

## आर्थिक, धोरणात्मक दिशा देणाऱ्या संस्थेच्या उपाध्यक्षपदी राणादादा

**मित्र उपाध्यक्ष म्हणून शासन आदेशाद्वारे केली निवड जाहीर होताच जिल्ह्यात कार्यकर्त्यांचा जल्लोष... जिल्ह्यालाही मिळणार नवी दिशा...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

केंद्र सरकारच्या नीति आयोगाच्या धर्तीवर राज्यात 'महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन' अर्थात 'मित्र' या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.राज्याची आर्थिक व धोरणात्मक दिशा ठरविणाऱ्या या महत्वपूर्ण संस्थेच्या उपाध्यक्षपदी तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष तथा अभ्यासू आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची निवड करण्यात आली आहे. गुरुवारी राज्य सरकारने तसा शासन आदेश जारी करीत आमदार पाटील यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आल्याचे जाहीर केले आहे. निवड जाहीर होताच जिल्ह्यात कार्यकर्त्यांनी फटाके फोडून पेढ वाटत जल्लोष साजरा केला. त्यांच्या निवडीने जिल्ह्यालाही नवी दिशा मिळणार असल्याचे जाणकार सांगत आहेत.

'मित्र' च्या नियामक मंडळाचे अध्यक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत तर सहअध्यक्ष उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार आहेत. या शासन निर्णयानुसार 'मित्र'द्वारे कृषी व त्यासोबत संलग्न क्षेत्र, आरोग्य व पोषण, शिक्षण, कौशल्य विकास व नावीन्यता, नागरिकरण व बांधकाम क्षेत्र विकास, भूमी प्रशासन, वित्त, पर्यटन, क्रीडा, ऊर्जा संक्रमण, वातावरणीय बदल, उद्योग, लघुउद्योग, पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान, पूरक सेवा व दळणवळण आदी विविध क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करून या क्षेत्रात महत्वपूर्ण काम केले जाणार आहे. राज्याच्या विकासाला आर्थिक, धोरणात्मक, तांत्रिक तसेच कार्यात्मक दिशा देणारा विचार गट म्हणून मित्र या संस्थेकडे पाहिले जाते. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठीच ही संस्था कार्यरत आहे. त्याशिवाय विविध शासकीय विभाग, भारत सरकार, नीती आयोग, सिव्हिल सोसायटी, विविध शासकीय संस्था तसेच खासगी व्यावसायिक संस्था यांच्यात सुसंवाद घडवून आणत विकासाच्या नवीन उपाययोजना सुचवण्यासाठी काम करण्याची जबाबदारी देखील 'मित्र' नावाच्या महत्वपूर्ण संस्थेवर सोपविण्यात आली आहे.



राज्य सरकारने गुरुवारी तसा शासन आदेश जारी करीत आमदार राणाजगजितसिंह पाटील, आमदार दिलीप वळसे पाटील व नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षिरसागर यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. राज्याच्या विकासात प्रादेशिक समानता आणण्यासाठी विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता 'मित्र'साठी प्रादेशिक मित्रचीही स्थापन करण्यात येणार आहे.

राज्य सरकारला आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था आणि सीएसआर ट्रस्ट फंड यांच्याकडून विकासात्मक उपक्रमांसाठी राज्य शासनाच्या मालमत्तेचे मुद्रीकरण आणि सवलतीचा वित्तपुरवठा यांसारख्या नाविन्यपूर्ण साधनांद्वारे अर्थसंकल्पबाह्य संसाधने उभारण्याचा सल्ला देणे. राज्य शासनाच्या विविध विभागांना मदत करत असताना स्थानिक पातळीवरील नियोजन आणि विकासात्मक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यासाठी जिल्ह्यांचा डेटा ॲनालिटिक्स माध्यमातून सहाय्य करणे, अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी परिणाम अधारित रिअल टाईम मुल्यांकनाच्या माध्यमातून मदत देणे आदी महत्वपूर्ण आणि मूलभूत कामे 'मित्र'च्या माध्यमातून साकारली जाणार आहेत. तसेच कमी प्रगती असणाऱ्या तालुक्यांमध्ये आणि शहरांमध्ये विकासाच्या विविध आणि लोकोपयोगी योजना राबविणे आणि त्या कामाचा वेळोवेळी आढावा घेणे हेदेखील मित्रचे महत्वाचे काम असणार आहे.नियुक्तीबाबत प्रतिक्रिया देताना आ.राणाजगजितसिंह पाटील म्हणाले, राज्याचा विकास साधण्यासाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्स्फॉर्मेशन (मित्र) या संस्थेची स्थापना करताना त्यातील मूळ उद्देश साध्य करण्याची मोठी जबाबदारी आहे. नीती आयोगाशी संलग्न अशी मित्रया संस्थेची कार्यपद्धती असून अशा महत्वाच्या संस्थेच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याने मला राज्याची सेवा करण्याची एक सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. या नियुक्तीबद्दल या संस्थेचे अध्यक्ष राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त करतो. मित्र संस्थेच्या झालेल्या नियुक्तीच्या माध्यमातून राज्याचा विकास साध्य करण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न करणार आहोत.

## वार्षिक परीक्षा १५ एप्रिलपूर्वी घ्याव्यात, शिक्षक परिषदेचे शिक्षणमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

इयत्ता पहिली ते नववी वर्गाच्या वार्षिक परीक्षा/पॅट अंतर्गत संकलित मूल्यमापन परीक्षा १५ एप्रिल पूर्वीच घेण्यात याव्यात, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे केल्याची माहिती राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी दिली.



यासंदर्भात देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांमधील इयत्ता पहिली ते नववी वर्गाच्या वार्षिक परीक्षा दरवर्षी मार्च अखेर अथवा एप्रिलच्या १२ तारखेपर्यंत शाळस्तरावरुन पूर्ण करण्यात येतात. परंतू दि. ५ मार्च रोजी शालेय शिक्षण विभागाने काढलेल्या परिपत्रकात यावर्षी वार्षिक परीक्षा दि. ८ एप्रिल ते २५ एप्रिल या कालावधीत घेण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत.

२५ एप्रिल रोजी शेवटचा पेपर झाल्यावर उत्तरपत्रिका तपासणी, सर्व विषयांचे गुण संकलित करुन निकाल तयार करणे, प्रगती पुस्तके लिहिणे, विद्यार्थी संचिका लिहिणे इत्यादी कामे पूर्ण करणे ४ ते ५ दिवसांत शक्य होत नाही. शिवाय शिक्षक मुख्याध्यापक यांना दररोज करण्याची ऑनलाईन कामांची व्याप्ती वाढतच आहे. माध्यमिक शाळांमध्ये विषय निहाय शिक्षक असतात. एका शिक्षकाकडे किमान तीन चार विषयांचा कार्यभार असतो. त्यामुळे उत्तरपत्रिका तपासून निकाल तयार करण्यास त्यांना पुरेसा वेळ मिळणार नाही.

तसेच वेळापत्रकात अचानक बदल केल्यामुळे पालकांनी एप्रिल महिन्यात केलेले कौटुंबिक प्रवास नियोजन विस्कळीत होणार आहे. शिवाय उन्हाची तीव्रता, पिण्याच्या पाण्याची टंचाई या गोष्टी विचारात घेता २५ एप्रिल पर्यंत परीक्षा चालू ठेवणे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने योग्य राहणार नाही.

या सर्व बाबींचा गांभिर्य पूर्वक विचार करून पहिली ते नववीच्या वार्षिक परीक्षा / झढ अंतर्गत संकलित मूल्यमापन परीक्षा दरवर्षीप्रमाणे १५ एप्रिल पूर्वीच घेण्यात याव्यात , अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर परिषदेचे वेनुनाथ कडू , निरंजन गिरी आदींच्या स्वाक्षरी आहेत.

## तलावांचे होणार पुनरुज्जीवन : 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजना

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

गावोगावी जलसंधारणाच्या दृष्टीने मोठे पाऊल उचलण्यात आले असून, शासनाने तलावांचे पुनरुज्जीवन आणि नाला खोलीकरण-रुंदीकरणासाठी विशेष योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' आणि 'नाला खोलीकरण व रुंदीकरण' या योजनांच्या माध्यमातून तलावातील गाळ काढण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

प्रत्येक गावाच्या तलावातील गाळ काढण्याचा संपूर्ण खर्च शासनाने उचलण्याचे निश्चित केले असून,हे काम एकाच दराने संपूर्ण राज्यात होणार आहे. यासाठी ग्राम पंचायती आणि स्वयंसेवी संस्थांना जिल्हा प्रशासनाच्या नियमानुसार अर्ज करून सहभागी होता येईल. याशिवाय,तलावातून काढलेल्या गाळाचा उपयोग शेतजमिनीच्या सुपीकतेसाठी करता यावा,यासाठी अल्पभूधारक, विधवा, दिव्यांग आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना शासनाकडून ठराविक दराने अनुदानही दिले जाणार आहे. या उपक्रमाला गती देण्यासाठी आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी भारतीय जैन संघटना (बीजेएस) आणि महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. एमागणी अर्ज भरण्यासाठी बीजेएसने 'बीजेएस डिमांड अँप उपलब्ध करून दिले असून, प्रशिक्षित समन्वयक व कार्यकर्ते जिल्हा, तालुका व गावपातळीवर ग्राम पंचायतींना आणि शेतकऱ्यांना सहकार्य करणार आहेत.

या योजनेसाठी 'सुहाना स्पाइसेस' यांनीही जनजागृतीसाठी सहकार्य केले आहे. अधिक माहिती करून घेण्यासाठी 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' या शासनाच्या पोर्टल www.shiwaar.com ला भेट द्यावी.संबंधित गावाच्या सरपंचांनी त्वरित अर्ज करून आपल्या गावातील तलाव पुनरुज्जीवित करण्यासाठी पुढाकार घ्यावा, तालुकानिहाय समन्वयक यांची नेमणूक करण्यात आली आहे.

### दिव्यांग प्रमाणपत्र तपासणी शिबिर

**परंडा, दि.७ मार्च -**

दिव्यांग बांधवांना दिव्यांगत्वाचे ऑनलाईन प्रमाणपत्र मिळावे त्याचबरोबर तालुक्यातील दिव्यांग प्रमाणपत्र पासून वंचित राहू नये या उद्देशाने दिव्यांग उद्योग समूहाचे राज्याध्यक्ष तानाजी घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग तपासणी शिबिर पार पडले. यात ३१ दिव्यांगाची तपासण्या करण्यात आल्या आहेत. या शिबिरामध्ये अस्तिव्यंग दिव्यांग, मतिमंद दिव्यांग, अंध अशा एकूण ३१ दिव्यांग नागरिकांची तपासणी करण्यात आली. या तपासण्या करण्यासाठी धाराशिव येथील तज्ञ डॉ. ज्योती कल्याणी, डॉ.आयुश शिंदे, डॉ. खंडागळे यांनी कामकाज पाहिले हा कॅम्प यशस्वी करण्यासाठी दिव्यांग उद्योग समूहाचे जिल्हाप्रमुख तानाजी घोडके, ता.प्रमुख तानाजी सांगडे, प्रकाश बदर, शिक्षण विभागातील हाजगुडे, जाधव व वैद्यकीय अधिकारी डॉ.कुलकर्णी, बापू खताळ आदींनी सहकार्य केले.



## युवा संसद २०२५ : युवकांसाठी सुवर्णसंधी, ९ मार्चपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

भारत सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाच्या वतीने विकसित भारत युवा संसद २०२५ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातील १८ ते २५ वयोगटातील युवक-युवतींना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.राजेंद्र वडजे यांच्या माहितीनुसार,इच्छुक उमेदवारांनी ९ मार्च २०२५ पर्यंत MyBharat.gov.in या पोर्टलवर नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.जिल्हास्तरीय निवड चाचणी १० व ११ मार्च रोजी सोलापूर विद्यापीठात होणार आहे.

सहभाग इच्छुक उमेदवारांनी What Does Viksit Bharat Mean To You या विषयावर मराठी,हिंदी किंवा इंग्रजी भाषेत २५MB पर्यंतचा एका मिनिटाचा व्हिडिओ तयार करून YouTube वर अपलोड करावा.त्याची लिंक ९ मार्चपूर्वी MyBharat पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य आहे.


सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातून एकूण १५० विद्यार्थ्यांची निवड केली जाणार असून,त्यांना १२ व १३ मार्च रोजी सोलापूर विद्यापीठ येथे होणाऱ्या युवा संसदेत सहभागी होता येईल.

विशेष म्हणजे,या युवा संसदेतून निवड झालेल्या युवकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी विकसित भारत २०४७ या विषयावर थेट संवाद साधण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. युवकांनी या संधीचा लाभ घ्यावा,असे आवाहन नेहरू युवा केंद्राचे उपसंचालक यांनी केले आहे.

## मराठवाड्याला पाणी देताना अटीमध्ये भेदभाव का?
## आ. कैलास पाटील यांचा जलसंपदा मंत्री यांना सवाल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

पार खोऱ्यातून पाणी वाटप करताना गिरणा प्रकल्पासाठी ३५० तालांकची पण त्याच खोऱ्यातून मराठवाड्याला देताना ही अट ५०० तालांक असा भेदभाव का करण्यात आला व अश्या अधिकाऱ्यावर कारवाई करणार का असा प्रश्न आमदार कैलास पाटील यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना विचारला. त्यावर अशी विसंगती जाणीवपूर्वक केली असेल तर निश्चित कारवाई करु असे उत्तर विखे पाटील यांनी दिले.



कैलास पाटील यांनी प्रश्न उत्तराच्या तासामध्ये मराठवाड्याच्या हक्काच्या १८३ द.ल.घ.मी पाण्याचा दुर्लक्षित मुद्दासमोर आणला. दुर्दैवाने आजपर्यंत मराठवाड्यातील एकाही लोकप्रतिनिधीनी या मुद्द्याकडे लक्ष वेधले नाही तो मुद्दा आमदार पाटील यांनी मांडला.

यावेळी पाटील म्हणाले की, पार या खोऱ्यात मराठवाड्यासाठी १८३ द.ल.घ.मी एवढे पाणी नियोजित होत मात्र हे पाणी देताना उंचीची अट घालून गिरणा प्रकल्पासाठी वेगळा न्याय तर मराठवाड्यासाठी वेगळा असा प्रकार झाल्याने गोदावरी खोऱ्यासाठी फक्त ४५.११ दलघमी पाणी उपलब्धता जलविज्ञान नाशिक यांनी दिल्याचे आमदार पाटील यांनी सभागृहासमोर मांडले.

गिरणासाठी ३५० तालांक एवढी अट ठेवण्यात आली तर मराठवाड्यासाठी त्याच खोऱ्यातून पाणी उचलण्यासाठी ही अट ५०० तालांकावर नेण्यात आल्याने गोदावरी खोऱ्यासाठी पाणी उपलब्धता कमी झाल्याचे पाटील यांनी सांगून असा प्रकार करण्याऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करणार का? असा सवाल आमदार पाटील यांनी मंत्री विखे पाटील यांना केला. तसेच याला जोडूनच आमदार पाटील यांनी सध्या नार आणि पार खोऱ्यात शिल्लक असणारे १७२ दलघमी हे पाणी मराठवाड्यासाठी देण्यासाठी कार्यवाही केली जाणार का असाही प्रश्न उपस्थित केला. त्यावर विखे पाटील यांनी असा भेदभाव झाल्याचे मान्य केल पण आता उंचीची अट शिथिल केली असून जाणीवपूर्वक असे झाले असेल तर निश्चित अश्या अधिकाऱ्यांवर कारवाई करु, असे आश्वासन विखे पाटील यांनी दिले.

## तुळजाभवानी मंदिरात चुकीच्या नोंदीने व्हीआयपी दर्शन पासचे वाटप

**कर्मचाऱ्यांच्या बेशिस्तपणा, कृत्यामुळे तुळजाभवानी मंदिर संस्थानचे आर्थिक नुकसान...व्हीआयपी दर्शन पासची रक्कम वसूल करण्यासाठी कर्मचाऱ्यांना पत्र..**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ मार्च -**

व्हीआयपी दर्शन पास रजिस्टर मध्ये चुकीच्या नोंदी करून व्हीआयपी नसणाऱ्या भाविकांना व्हीआयपी दर्शनास सोडले म्हणून येथील सामाजसेवक जयकुमार पांढरे यांनी मंदिर संस्थांचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांना तक्रार अर्ज दिला होता.

सदर तक्रारीवर २२ फेब्रुवारी रोजी मंदिर संस्थानकडून पांढरे यांना पत्राद्वारे कळवले की, मंदिरचे कर्मचारी गणेश मोटे व प्रशांत जाधव यांना पत्र दिले की दर्शनासाठी सोडलेली व्यक्ती कोणत्या पदावर कार्यरत आहे. त्यांना कशाच्या आधारे दर्शनाला सोडण्यासाठी आपण शिफारस केली याचा बोध होत नसल्याने संबंधित दर्शन व्यवस्था करण्याचे प्रयोजन लेखी खुलासा मध्ये आपण सादर सदरील व्यक्ती हे त्याप्रमाणे आपणाकडून प्रतिव्यक्ती पाचशे रुपये प्रमाणे एकूण तीन व्यक्तींचे रुपये दीड हजार का वसुल करू नये,

याबाबत आपण हे पत्र प्राप्त होताच २४ तासांच्या आत स्वयंस्पष्ट खुलासा निम्न स्वाक्षरीत यांच्याकडे सादर करावे हे स्पष्ट खुलासा द्यावा, असे पत्र दिले आहेत. तरी देखील आपले पत्र देऊन एकूण तेरा दिवस होत असून सदर अधिकाऱ्यांनी कसलाही खुलासा आपणास दिलेला नाही तसेच आपल्या पत्राचा सदर अधिकाऱ्यांनी अवमान केला असून त्यांच्यावर असतागायत कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. वरील व्यक्तींना आपल्या पत्रानुसार कामात कसूर व चुकीच्या पद्धतीने व्हीआयपी दर्शन पास दिले, असे सिद्ध झाले आहे. अशा कर्मचाऱ्यांकडून बेशिस्तपणा घडला व त्यांच्या कृत्यामुळे तुळजाभवानी मंदिर संस्थान (ट्रस्ट) चे आर्थिक स्वरूपाचे नुकसान केले आहे.

त्यांच्या कामात कसुर केलेला दिसून आला असून अशा दोषी कर्मचारी अधिकारी यांच्याकडून प्रति व्यक्ती (५००) रुपये प्रमाणे संपूर्ण रक्कम त्यांच्या वेतनातून वसूल करावे व महाराष्ट्र नागरिक (सेवा व शिस्त) अपील नियम ५ मधील तरतुदीनुसार/१९६९/ नियमानुसार त्यांच्याविरुद्ध विना विलंब शिस्तभंग व दंडात्मक स्वरूपाची कारवाई करून त्यांच्या गोपनीय अहवालावर व सेवा पुस्तकेवर याची नोंद करावी, अशी मागणी पांढरे यांनी केली आहे.

### व्हीआयपी भाविकांचे पदनाम चेक न करता नोंदी...

तुळजाभवानी मंदिरामध्ये चुकीच्या पद्धतीने व्हीआयपी स्पेशल दर्शन पास कुठलीही शाहनिश न करता दिले जातात. व्हीआयपी दर्शन पास रजिस्टरच्या नोंदी बघितल्यानंतर व्हीआयपी नसणाऱ्यांच्या बोगस नोंदी करून व्हीआयपी पास दिल्याचे दिसून येत आहे. पाच देणाऱ्यांचे पदनाम चेक न करता दिल्याचे दिसून येत आहे. रजिस्टरला अनेक ठिकाणी केवळ नोकरी व्यवसाय अशा नोंदी आहेत. किरकोळ व्यापारी दुकानदारांना वर्ग तीन वर्ग चारच्या नोकरी असणाऱ्या कर्मचाऱ्यांना देखील व्हीआयपी पास दिल्याचे नोंदीवरून समजते. रजिस्टर नोंदीसाठी असणाऱ्या शेराचे रखने देखील रिक्त आहेत. एकंदरीत यावरून रजिस्टरला व्हीआयपींच्या अनेक बोगस नोंदी असल्याचे निष्पन्न होते.


**जाहीर प्रकटन**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार यांचे कार्यालय कळंब**
**(संकलन-कुळ)**
दुरध्वनी क्र.०२४७३-२६२२५४ Email Id-tahkalambgmail.com

**जा.क्र.२०२४/कुळ/कावि-८७ दिनांक :०५/०३/२०२५**

कळंब बाबुराव होनमाने रा. नागझरवाडी ता. कळंब यांनी ज्याअर्थी श्रीमती कलावती मा.जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे अर्ज सादर करुन मौ. नागझरवाडी येथील जमीन ग.नं.३० क्षेत्र00हे.९३ आर सिलींग जमीन विक्री करण्यास परवानगी मिळणे बाबत विनंती केली आहे. सदर प्रकरणाचा संचिका क्र.२०२४/कुळ/कावि-८७ असा आहे. त्यावरुन मौ.नागझरवाडी तसेच कळंब तालु तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील नमुद अर्जाच्या अनुषंगाने कोणाचा कांही आक्षेप असल्यास त्या ईसम, संस्थेने हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन आठ दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, कळंब यांचेशी लेखी स्वरुपात आक्षेप नोंदवावा. जर मुदतीत कोणाचा कांही आक्षेप आला नाही तर प्रकरण उचित आदेशासाठी राखीव ठेवण्यात येईल.

**जाहीर प्रगटन देणार**
**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार, कळंब**

## अग्रलेख...

# आव्हानांच्या छाताडावर...

कोणत्याही सरकारकडून जनतेच्या काही अपेक्षा असतात. सामान्यतः शांततापूर्ण जगण्याचा नैसर्गिक हक्क जपला जावा, ही सर्वसामान्य जनतेची सरकारकडून असलेली प्राथमिक आणि वास्तविक अपेक्षा असल्याने त्या अपेक्षेस धक्का लागणार नाही, याची खबरदारी घेणे व तसा विश्वास जनतेच्या मनात रुजविणे ही सरकारांची जबाबदारी असते. याचे मुख्य उत्तरदायित्व सरकारचे प्रमुख या नात्याने देशाच्या संदर्भात पंतप्रधान किंवा राज्यांच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांवर असते. १५ ऑगस्ट २०१४ रोजीच्या स्वातंत्र्य दिनी लाल किल्ल्यावरून देशातील जनतेस उद्देशून केलेल्या आपल्या पहिल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याच अपेक्षापूर्तीचे आश्वासन दिले होते. जनतेस सुरक्षित आणि शांततापूर्ण जीवनाची हमी देण्यासाठी सरकार आणि समाज यांच्यात मानसिक समन्वयाची गरज असते. त्यासाठी ज्याप्रमाणे सरकारकडून जनतेच्या काही अपेक्षा असतात, तशाच अपेक्षा सरकारांनी जनतेकडूनही ठेवावयास हव्यात. असे झाले तर जनजीवनाचा गाडा सुरळीत चालतो. १० वर्षांपूर्वीच्या त्या भाषणात मोदी यांनी जनतेस काही हमी देतानाच जनतेकडून काही अपेक्षाही अप्रत्यक्षपणे व्यक्त केल्या होत्या. प्रामुख्याने समाज आणि सरकार यांच्यातील दुवा असलेल्या प्रशासन व्यवस्थेस त्यांनी खडे बोल सुनावले होते. यापुढे 'चलता है' संस्कृती चालणार नाही, असे बजावतानाच, 'क्षमता सिद्ध करा, नाही तर चालते व्हा' असा थेट इशाराच त्यांनी त्यावेळी दिला होता. आज त्या भाषणाची, त्या इशाऱ्याची आणि त्या अपेक्षांची आठवण ठेवण्याची वेळ आली आहे. कारण, देशातील सामाजिक, राजकीय, प्रशासकीय परिस्थितीवर त्या इशाऱ्याचा आणि अपेक्षांचा काय परिणाम झाला, त्यात सरकारची जबाबदारी किती, समाजाची जबाबदारी किती आणि अपेक्षापूर्तीच्या या पर्वात समाजाने काय मिळविले, सरकारांनी काय मिळविले याचा धांडोळा घेणे आवश्यक ठरते. विशेषतः गेल्या काही महिन्यांत विधानसभेच्या निवडणुकीनंतर महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकार अस्तित्वात आल्यानंतर राज्यात ज्या काही सामाजिक, राजकीय उलथापालथींचा गदारोळ सुरू आहे, ते पाहता, महाराष्ट्रापुरते तरी पंतप्रधानांच्या त्या वक्तव्याची आठवण करून घेणे गरजेचे ठरले आहे. स्वच्छ, पारदर्शक प्रशासन ही सामान्य माणसाच्या सुरक्षित आणि शांततापूर्ण जगण्याचा हक्क जपण्याची पहिली गरज असते. राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर त्यांनी या गरजेच्या पूर्ततेसाठी हमीपूर्वक सुरू केलेल्या वाटचालीची फळे किंवा परिणाम आता दिसू लागले आहेत. अर्थात्?, स्वच्छ प्रशासनासाठी काही वेळा कठोर निर्णयांची आवश्यकता असते. तसे करणे हे एक आव्हान असते. त्यासाठी आवश्यक असलेली कृती करणे सोपे नसते, अनेकदा त्याचे राजकीय परिणाम गंभीरदेखील असू शकतात. कदाचित त्यामुळेच कठोर निर्णय घेताना बोटचेपेपणा दाखविणे नेत्यांस भाग पडते आणि त्याचे थेट किंवा अप्रत्यक्ष परिणाम जनजीवनास भोगावे लागतात. ते टाळण्याकरिता आव्हानाच्या छाताडावर पाय देऊन उभे राहण्याचे धाडस दाखविताना, जनतेस सुरक्षित जगण्याच्या हमीचे उत्तरदायित्व पेलणाऱ्या मुख्यमंत्र्यांना प्रशासन, सरकार आणि समाजाचीही सक्षम साथ आवश्यक असते. गेल्या काही दिवसांत महाराष्ट्रात उफाळून आलेल्या अस्वस्थ वातावरणावर मात करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उचललेली कठोर पावले ज्या दिशेने महाराष्ट्रास घेऊन जाऊ पाहात आहेत, ते पाहता ती वाट सोपी नाही, हे स्पष्ट असले, तरी जनतेच्या प्राधान्याच्या अपेक्षांची पूर्तता करण्याचा त्यांचा निर्धार अदम्य आहे, हे स्पष्ट दिसू लागले आहे. सरकार स्थापन करण्याच्या मुहूर्तावरच त्यांनी या दिशेने पहिले पाऊल टाकले, तेव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. सातत्याने सत्ताकारणाच्या केंद्रस्थानी असल्यामुळे आणि त्यामुळेच महत्त्व प्राप्त झालेल्या काही प्रस्थापितांना मंत्रिमंडळातून वगळण्याच्या निर्णयामुळे फडणवीस सरकारची वाटचाल खडतर राहील, अशी अटकळही बांधली जात होती. क्षमता सिद्ध करा किंवा चालते व्हा, हा पंतप्रधान मोदी यांनी दिलेला संदेश केवळ नोकरशाहीसाठी नव्हता, तर सरकारसोबत काम करण्याची जबाबदारी असलेल्या प्रत्येकासाठी होता, हे अनेकांस गेल्या १० वर्षांत बहुधा उमगलेच नव्हते. भरभक्कम जनादेश प्राप्त होताच, जनतेच्या आपल्यावरील विश्वासाच्या खात्रीने देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्यांदाच या संदेशाचे तंतोतंत पालन केले आणि दिग्गज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काही नेत्यांच्या हाती नारळ दिला. संघटनेची गरज लक्षात घेऊन भारतीय जनता पक्षातीलही काही नेत्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही, पण पक्षाची कार्यपद्धती जाणून असलेल्यांना त्याचे फारसे आश्चर्य वाटले नाही.

प्रस्थापितांना सत्तेबाहेर ठेवणे हा फडणवीस यांचा पहिला धक्का होता, हे आता स्पष्ट होऊ लागले आहे. बीडमधील मस्साजोगच्या सरपंचांच्या भीषण हत्येप्रकरणी समोर येऊ लागणारे वास्तव कोणत्या दिशेला पोहोचणार, याची जाणीव होताच त्यांनी आपल्या प्रशासन कौशल्याचा कठोर वापर सुरू केला आहे. हे आव्हानही सोपे नाही, याची पुरेपूर खात्री असतानाही त्यांनी धनंजय मुंडे यांना राजीनामा देण्यास भाग पाडून जनतेच्या अपेक्षापूर्तीसाठी जबाबदारीचे भान राखले, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावयास हवे. मुंडे यांच्या राजीनाम्याने राजकारण ढवळून निघेल, सत्तेतील सहकाऱ्यांमध्ये असंतोष उफाळेल वगैरे अटकळींचे मुटकुळे बांधून फडणवीस यांनी घेतलेल्या या निर्णयानंतर आता शासनातील स्वच्छता मोहीम वेग घेणार, हे स्पष्ट झाले आहे. मुंडे यांचा राजीनामा घेतल्यानंतर सरकारमध्ये महत्त्वाच्या स्थानावर बसलेल्या अन्य काही नेत्यांच्या भवितव्यावरही निर्णय घेण्याचे कर्तव्य फडणवीस यांना बजावावे लागणार आहे. त्यात मंत्रिपदावर असलेले सहकारी पक्षांचे काही नेते आहेत आणि स्वपक्षाच्या काही नेत्यांनाही आपले निर्दोषित्व सिद्ध करावे लागणार आहे. मस्साजोगचे सरपंच असलेल्या संतोष देशमुख यांच्या राक्षसी हत्याप्रकरणामागील कटाचे काही धागेदोरे धनंजय मुंडे यांच्याकडे निर्देश करीत असल्याने सामाजिक रोषाचा उद्रेक होऊनही, केवळ आततायीपणाने त्यांच्यावर कारवाई न करता काही निश्चित संकेत प्राप्त होताच विनाविलंब कारवाई करून त्यांनी मुंडे यांना राजीनामा देण्यास भाग पाडले. आता सहकारी पक्षातील माणिकराव कोकाटे यांच्या संदर्भात निर्णय घेण्याची कसोटी मुख्यमंत्र्यांना पार पाडावी लागणार आहे. सरकारची फसवणूक केल्याचा आरोप असलेली व्यक्ती थेट सरकारमध्येच असणे राजकीय सभ्यतेच्या संकेतास धरून नसते. पारदर्शकपणे आणि संविधानाचे पालन करून पदाचे पावित्र्य राखण्याची शपथ घेतलेल्या मंत्र्यावर असा आरोप असणे हे एकूणच सरकारच्या प्रतिमेस आणि प्रतिष्ठेसही बाधा आणू शकते. कोकाटे हे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री आहेत. त्यांच्यावरील फसवणुकीचा ठपका न्यायालयाने पुसून टाकलेला नाही. त्यांच्या शिक्षेस तात्पुरती स्थगिती मिळाल्याने त्यांचे मंत्रिपद तूर्त वाचल्याची भावना व्यक्त होत असली, तरी कारभारातील पारदर्शकतेची आणि स्वच्छतेची हमी देणाऱ्या सरकारमध्येच असा कलंक असलेली व्यक्ती असल्यास प्रतिमा आणि प्रतिष्ठेचे काय होणार, याचा विचार करणे फडणवीस यांना अपरिहार्य ठरणारच आहे. अगोदरच्या महायुती सरकारच्या काळातीलच काही निर्णयांचा फेरविचार करण्याचे, काही निर्णयांना स्थगिती देण्याचे आणि काही निर्णय पूर्ण रद्द करण्याचे धाडस दाखवून फडणवीस यांनी 'चलता है' संस्कृतीला धक्का दिला आहे. ते योग्यच आहे.

सरकार आणि समाज यांच्यामधील दुवा म्हणून काम करणे हे मुख्यमंत्र्यांचे कर्तव्य असते. विश्वास जपण्याची हमी देणारे निर्णय कटू असतील, कठोरही असतील; पण त्यामुळेच समाजाच्या नैसर्गिक हक्कांची जपणूक होत असेल, तर अशा निर्णयांच्या परिणामांची पर्वा न करता पावले टाकण्याचे आव्हान पेलण्याचे धाडस फडणवीस यांनी दाखविले आहे. सत्ता सांभाळण्यासाठी समाजाच्या विश्वासास वेठीला धरणाऱ्या बोटचेप्या राजकारणाचा काळ आता मागे पडत चालला आहे, याची चुणूक दिसू लागली आहे. समाजाच्या अपेक्षापूर्तीची आपली जबाबदारी पार पाडण्यास सरकार सिद्ध झाले आहे. आता त्यासाठी आवश्यक असलेले नैतिक पाठिंब्याचे बळ सरकारला देण्याची जबाबदारी समाजाची असणार आहे.

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (१४)

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

कुरुक्षेत्रावर काही वर्षांपूर्वी अमेरिका आणि रशिया यांच्या संयुक्त अणुशास्त्रज्ञांच्या चमूने संशोधन करून महाभारतीय युद्ध हे द्वापारयुगातील 'ॲटोमिक वॉर' होते, यावर शिक्कामोर्तब केले. त्याचा स्पष्ट अर्थ असा निघतो की, भारतीयांना सहस्त्रावधीच नव्हे, तर लक्षावधी वर्षांपासून अणू विज्ञानाची माहिती होती. त्या विज्ञानाच्या साह्याने त्यांनी असुरी शक्तींचा, दुष्ट शक्तीचा सनातन धर्म नष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या धर्मद्रोही विध्वंसक शक्तींचा नाश केला. त्याचमुळे इतिहासाच्या प्रदीर्घ आक्रमणकारी आणि संघर्षमय कालखंडात हिंदू धर्म, हिंदू संस्कृती आणि हिंदू समाज आपल्या परंपरा आणि वैशिष्ट्यांसह टिकला; त्याचेच मूर्तिमंत उदाहरण म्हणजे नुकत्याच झालेल्या प्रयागच्या कुंभमेळ्यात सुमारे ६६ कोटी हिंदूंनी श्रद्धेने मंगलस्नानाची डुबकी घेतली. रशिया, अमेरिका या देशांपर्यंतच ही जिज्ञासा आता थांबलेली नाही तर अनेक देशांमध्ये प्राचीन भारतीय अनेक शास्त्रांचे अधिकृत अध्ययन, संशोधन करणारे अध्यासने निर्माण झाली आहेत. अमेरिकेतील 'नासा' या प्रसिद्ध संशोधन केंद्रात प्राचीन भारतीय अनेक शास्त्रांचा प्राधान्य क्रमाने अभ्यास केला जातो. याची अधिकृत माहिती मला त्याच संस्थेत सुमारे १७ वर्षे संशोधक म्हणून कार्यरत असलेले मूळ निवासी बंगळुरू येथील डॉ. एस. राव यांनी दिली. त्याचे असे झाले-

सेवानिवृत्तीनंतर मी पुण्याला सुमारे १५ वर्षे होतो. संघकार्याशी संबंधित होतो. संघ म्हणेल ते काम करीत होतो. तेथील अनेक दायित्वांपैकी गीता धर्म मंडळाशी संचालक सदस्य म्हणून संबंधित होतो. गीता धर्म मंडळाच्या अनेक उपक्रमांपैकी 'नित्यज्ञान सत्र' या उपक्रमाची जबाबदारी माझेकडे होती. एक दिवस बैठक चालू असताना तेथे डॉ. एस. राव यांचे आगमन झाले त्यांनी त्यांचा परिचय दिला. त्यात नासामधून सेवानिवृत्त होऊन आता मायदेशी परत आल्यावर प्राचीन भारतीय विविध शास्त्रांचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन करणारी एक संस्था काढण्याचा मानस आहे, त्याच हेतूने पुणे येथील वैदिक संशोधन मंडळ, भांडारकर इन्स्टिट्युट गीता धर्म मंडळ अशा प्रस्थापित आणि प्रसिद्ध संस्थांना मी भेटी देत आहे. 'टु फाईंड द सोर्सेस अँड रेफरन्सेस फॉर माथ प्रपोजड प्लॅनिंग-' त्यासाठी मी महिनाभर येथे राहणार आहे, असे त्यांनी सांगितले. बैठक संपली. पण मला गीता धर्म मंडळात नित्य चालणाऱ्या ज्ञानसत्रात भाषण देण्यासाठी एक आधुनिक विज्ञान युगातील 'वैज्ञानिक' आणि तेही नासासारख्या विश्वविख्यात संस्थेमधील वक्ता सापडला. माझ्या दृष्टीनने तर ती पर्वणीच होती. दुसऱ्या दिवशी त्यांच्या निवासस्थानी जाऊन मी त्यांची भेट घेतली. त्यांना उपक्रमाची माहिती दिली. त्यांनी मान्य केले. त्यांच्याशी विचारविनिमय करून त्यांना पुढील दोन विषय व्याख्यानासाठी दिले ते असे -
- 'रामायणातील रामसेतू ही वास्तवता की कविकल्पना?' (कारण त्या काळात हा विषय 'हॉट अँड बर्निंग टॉपिक' होता) आणि दुसरा 'भारतीय प्राचीन संस्कृतीतील विविध शास्त्र परंपरा आणि आधुनिक विज्ञान.'

वरील दोन्हीही विषयांच्या अनुषंगाने त्यांनी विलक्षण आणि आश्चर्यमुग्ध करणारी माहिती दिली. ते म्हणाले, ''आमच्या नासातील संशोधकांनी उपग्रहातील अत्याधुनिक उपकरणांच्या साह्याने जे फोटोग्राफ्स घेतले, त्यात रामेश्वरमच्या समुद्रधुनीपासून तो लंकेपर्यंतचा एक समुद्रांतर्गत असलेला कसल्या तरी बांधकामाचा (ब्रिज-वे) स्पष्टपणे दिसतो. त्याला त्यांनी 'ॲडम्स-ब्रिज' असे जरी म्हटले तरी त्या आपल्या रामायणातील उल्लेखाप्रमाणे तो 'रामसेतू'चं आहे. कारण आधुनिक मोजमाप करण्याच्या पद्धतीप्रमाणे त्या सेतूचे वय नासातील शास्त्रज्ञांनी १७ लक्ष ३२ हजार वर्ष पूर्व काढले आहे. आपल्या युग कालगणनेप्रमाणे ते वय १७ लक्ष २८ हजार निघते. त्यामुळे रामसेतूच्या अस्तित्वामुळे आपले रामायण सिद्ध होते. प्रभू रामचंद्रांचा अवतार सिद्ध होतो.'' त्यांच्या या सखोल, संशोधित माहितीमुळे नित्य ज्ञानसत्रात सहभागी झालेले सर्व आनंदित झाले. या बाबतीत प्राध्यापक असलेल्या एका भगिनीने त्यांना प्रश्न विचारला की, हे जर इतके स्पष्ट आहे तर ''रामायण हे झालेच नाही हे 'शपथपत्रावर' (Affidavit) काही लोक कसे लिहून देतात?'' त्यावर ते म्हणाले, ''ही केवळ तुष्टीकरण नीती आहे. त्याने रामसेतू आणि रामायणावर काही परिणाम होत नाही.'' दुसऱ्या दिवसाच्या दिलेल्या विषयावर बोलताना त्यांनी विविध शास्त्रातील पारंपरिक असलेल्या अनेक संकल्पनांमागील विज्ञान मांडले. त्यातील अनेक महत्त्वाच्या संकल्पना या महाभारतातील होत्या. आधुनिक काळातील 'टेस्ट ट्यूब बेबी' आणि कौरवांच्या उत्पत्तीपासून तो महाभारतातील अणू विज्ञानावर आधारित अस्त्र परंपरेपर्यंत. ते म्हणाले, ''आजचे युद्ध विज्ञान हे तांत्रिक कौशल्यावर व एनर्जीवर आधारित आहे. एके फॉर्टी सेव्हन, मिसाईल, टारगेट- ओरिएंटेड मिसाईल, द्वारकेच्या संरक्षणासाठी शत्रूचा हल्ला झाल्याबरोबर त्याचा प्रतिकार करणारी यंत्रणा (ऑटोमॅटिक डिफेन्स सिस्टिम) तिच्या तटबंदीच्या चारही दिशेला प्रस्थापित केलेली होती. अत्याधुनिक युद्धात वापरल्या जाणाऱ्या सर्व अस्त्रांच्या बीजभूत संकल्पना या महाभारतात वर्णन केलेल्या दिसतात. भीष्म, द्रोण, अर्जुन यांनी एका वेळी शेकडो बाणांचे प्रक्षेपण करण्याचे युद्ध विज्ञानाचे आधुनिक स्वरूप म्हणजे एक फॉर्टी सेवन, मल्टी मिसाईलचा मारा करणारे रणगाडे, विराट युद्धात संमोहनशास्त्राच्या माध्यमातून कौरवांच्या सर्व प्रमुख योद्ध्यांना मूर्च्छित करण्याचा आधुनिक अवतार म्हणजे शत्रूच्या बंकर्समध्ये फोडण्यात येणारे विविध गॅस-पिल्स्, छोटे गॅस सिलेंडर्स-''

या भाषणाचा समारोप करताना त्यांनी मांडलेल्या विचारांनीच आपण या लेखाचा शेवट करूया. ते म्हणाले, ''आपली ज्ञानपरंपरा, शास्त्रपरंपरा अतिशय श्रेष्ठ आहे. कारण ती ऋषिमुनींच्या ऋतंभरा प्रज्ञेतून (बियाँड स्पेस अँड टाईम) निर्माण झाली आहे. त्यामुळे रामायण-महाभारत या महाकाव्यांचा, त्यातील विखुरलेल्या जीवनस्पर्शी, वैज्ञानिक बीजभूत असलेल्या अनेक संकल्पनांचा, आजच्या परिस्थितीच्या संदर्भात, आजच्या प्रगत विज्ञानाच्या संदर्भात विचार नवीन पिढीने आवश्यक केला पाहिजे. आपल्या पूर्वजांनी संशोधित करून ठेवलेले संचित अतिशय भव्य दिव्य आहे. नासातील अंतराळ संशोधक (स्पेस सायंटिस्ट) भारतीय खगोल विज्ञानाचा, जोतिष विज्ञानाचा, वराहमिहीर, आर्यभट्ट यांच्या ग्रंथांचा मुळातून अभ्यास करतात. "Thay get the radymade formulas and find the solution'- मग आम्ही का मागे राहावे?''

- विचारी मना तूची शोधूनि पाहे. (माझ्या जवळील टिपणावरून)

९८६०२९६१३१


(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# पाण्याचे पुण्य अन् बॉटलचे मूल्य

जग वेगाने जवळ येते आहे. माणुसकी तेवढ्या वेगाने संपत चालली आहे. कुटुंब व्यवस्था ढासळत चालली आहे. संस्काराचे तुणतुणे वाजवले जात असले, तरी कुटुंब व्यवस्थेच्या चिंध्या होत आहेत. मोबाईल, इन्स्टाग्राम, समाजमाध्यमांवर दोषारोप करून आपण हात झटकत असलो, तरी सदृढ समाजाची जबाबदारीही आपलीच आहे. समाजात विकृती आणि परिवारात कटूता वाढत चालली आहे. स्पर्धेतून द्वेषाची भावना बळावत चालली आहे. अभ्यासाने माणूस शिक्षित होतो. परंतु, त्याला सुशिक्षित म्हणता येणार नाही. अभ्यासात हुशार असलेल्यांना व्यवहार जमत नसल्याची अनेक उदाहरणं आहेत. अगदी गमतीने सुवर्ण पदकांची माळ गळ्यात पडलेल्याला बाजारात बटाटे आधी की टमाटर आधी विकत घ्यावे, याचे व्यावहारिक ज्ञान नसल्याचे म्हटले जाते. हा अतिशयोक्तीचा विषय असला, तरी समाजात बोटावर असे महाभाग वावरताना दिसून येतात. समाजावर राजकारणाचा पगडाही वाढतो आहे. समाजकारणातून राजकारणात जाणाऱ्यांच्या दारात आता फक्त हत्तीच डोलताना दिसून येत नाही. बाकी सर्व सुविधा हात जोडून उभ्या असतात. या सर्व गोष्टी ज्याच्या त्याच्या नशिबाने मिळत असल्या, तरी समाजात वावरताना स्वतःची जागा स्वतःच निर्माण करावी लागले. आता उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले आहेत. आजपासून १५-२० वर्षांपूर्वीपर्यंत गाव खेड्यांसह शहरातील चौकांमध्ये अगदी बसस्थानकावर मातीचे दोन रांजण त्यावर लाल कापड असलेल्या पाणपोई हमखास दिसत होत्या. फुकटचे पाणी नको म्हणून कोणी त्या ठिकाणी पाणी वाटप करणाऱ्याच्या हातावर चिल्लर पैसे ठेवत होते. हळूहळू समाजातून चांगल्या गोष्टी अदखलपात्र होऊ लागल्या. उन्हाळ्याच्या दिवसात प्रवासाला निघताना वॉटर बॅग हमखास सोबत घेतल्या जात होती. आता सर्वच बदलत जात असल्याने पाणपोईही काळाच्या पडद्याआड गेली आहे. शासकीय कार्यालयांमध्ये उन्हाळ्यात रांजण दिसून होते. आता शासकीय कार्यालयात तर पिण्याच्या पाण्यासाठी दररोज थंड पाण्याच्या कॅन मागवल्या जातात. काही समाजसेवक उन्हाळ्यात चौकांमध्ये थंड पाण्याच्या कॅन ठेवतात. जीवन जगण्यात 'स्टेट्स' आल्याने अनेक गोष्टी सहज बदलत गेल्या. आता प्रवासात निघताना पिण्याच्या



पाण्यासाठी वॉटर बॅगची गरज नाही. बसस्थानकावरील ती पाणपोईही हरवली आहे. त्याची जागा आता 'बिसलरी'ने घेतली आहे. बरं, पाण्याची कोणतीही बॉटल ही बिसरलीच असते. आता हातोहात, पावलोपावली थंड पाण्याच्या बॉटल विक्रीसाठी उपलब्ध होऊ लागल्या आहेत. बसस्थानकावर पाणीपोईसोबतच गावातील कोण्यातरी मोठ्या व्यक्तीच्या स्मृतीत साखळीने दोन पेले बांधून असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्या दिसून येत होत्या. आता समाजसेवेतील पाणी पाजून पुण्य मिळवण्याचा भाव कमी होत असल्याने राज्य परिवहन मंडळानेच १५ रुपयांत नाथजल विक्रीसाठी बसस्थानक परिसरात उपलब्ध करून दिले आहे. एकंदरीत अल्प कालावधीत पाण्याच्या बॉटलने आपला जम बसवला आहे. पुण्य देणारे पाणी आता व्यवसाय झाले आहे. लिटर, अर्धा लिटरच्या पाण्याच्या बॉटलने प्रवासात तृष्णातृप्ती होते. हॉटेलात जेवायला गेल्यावर वेटरच नॉर्मल की चिल्ड विचारत बॉटल आणून ठेवू लागले आहेत. या प्रवासात पाण्याच्या बॉटलने आपले अस्तित्व निर्माण केले आहे. बॉटलची गरज लक्षात घेता आता त्याचे कारखाने तयार झाले आहेत. पाण्याच्या एक लिटरच्या १२ बॉटलचा बॉक्स ठोक बाजारात ८० रुपयांना मिळतो. याचा अर्थ सरासरी एक बॉटल ६ रुपये ५० रुपयांना मिळते. मात्र, पाण्याच्या बॉटलने आपली उपयोगिता सिद्ध केल्याने तिचे भावही स्थळ, काळपरत्वे बदलत जातात. अमेझॉनवर एक लिटर पाण्याची बॉटल १८ रुपयांची आहे. सुपर मार्केटमध्ये याच बाटलीची किंमत सुमारे २० रुपये आहे. चांगल्या हॉटेलमध्ये याच बाटलीची किंमत ३०-४० तर विमानतळावर त्या बॉटलची किंमत शंभरीच्या आसपास गेलेली असते. बाटली आणि ब्रँड एकच आहे, फक्त जागा बदलते. प्रत्येक ठिकाण एकाच उत्पादनाला वेगळे मूल्य देते. जेव्हा तुम्हाला असे वाटते की, तुमची काहीच किंमत नाही आणि प्रत्येक जण तुम्हाला खाली आणतो तेव्हा तिथे राहू नका, उठून नवीन जागा शोधा. ठिकाणे बदलण्याचे धाडस ठेवा आणि अशा ठिकाणी जा जेथे तुम्हाला तुमच्या लायकीचे मूल्य दिले जाईल. अन्यथा पाणपोईसारखे काळाच्या पडद्याआड जाऊन त्याची जागा बॉटल घेतल्याशिवाय राहत नाही.


९८८१९०३७६५

## दखल

# फडणवीसांचा 'मोदी अवतार'

**मोरेश्वर बडगे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालचे महायुतीचे सरकार सत्तेत आल्याला तीन महिने उलटले आहेत. या काळात बरेच काही घडलंय-बिघडलंय. पहिली विकेट पडली. दुसरीही डेंजर झोनमध्ये आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण मंत्री राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावा लागला. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण मुंडे यांना भोवलं. तसं पाहिलं तर या हत्येशी त्यांचा थेट प्रत्यक्ष संबंध आहे, असं अजून तपासात समोर आलेलं नाही. सीआयडीने न्यायालयात दाखल केलेल्या दोषारोपपत्रातही मुंडे यांचं नाव नाही. पण मारेकरी आरोपी मुंडेंशी संबंधित आहेत. या हत्येचा प्रमुख सूत्रधार वाल्मीक कराड हा आपला निकटवर्ती आहे, ही बाब मुंडे यांनीही लपून ठेवलेली नव्हती. त्यामुळे मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी पुढे आली. मुंडे राजीनाम्याला तयार नव्हते. त्यांच्या पक्षाचे म्हणजे राष्ट्रवादीचे सुप्रीमो अजितदादा पवार यांनाही त्यांचा राजीनामा मागायची हिंमत झाली नाही. 'योग्य वेळेस राजीनामा घेतला जाईल' असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणत होते. ८४ दिवसांनी ती वेळ आली. सरपंचाला ज्या क्रूरतेने मारले गेले त्याचे पोलिसांनी पुराव्यादाखल आरोपपत्रात जोडलेले फोटो बाहेर आले आणि स्फोट झाला. राज्यात संतापाची लाट पसरली. 'लोहा गरम है. मार हतोडा' असा एक संवाद 'शोले' सिनेमात आहे. फडणवीसांनी हातोडा मारला. फडणवीसांनी घाई केली असती तर हा विषय भलताच भरकटला असता. त्याला मराठा विरुद्ध ओबीसी असे स्वरूप दिले जाण्याचा धोका होता. त्यामुळेच योग्य वेळेची वाट पाहिली गेली. 'मी त्यांना मुक्त केलंय' एवढेच फडणवीस बोलले. फडणवीसांना हा निर्णय सोपा नव्हता. धनंजय मुंडे हा मराठवाड्यातील अजितदादांच्या राष्ट्रवादीचा मोठा चेहरा आहे. शिवाय मराठ्यांच्या राष्ट्रवादीत मुंडे हे बलाढ्य ओबीसी नेते आहेत. दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांचे पुतणे आहेत. ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना अजितदादांनी मागेच घरी बसवले. आता मुंडे यांनाही गमावले तर अवघड होईल, याची अजितदादांना चांगली कल्पना आहे. तरीही दादा फडणवीसांना रोखू शकले नाहीत. महायुती सरकार तिघांचे असले तरी मीच 'पॉवर सेंटर' आहे, ही गोष्ट फडणवीसांनी या निमित्ताने मित्रपक्षांच्या लक्षात आणून दिली आहे. मुख्यमंत्र्याला निर्णयाचा सर्वोच्च अधिकार असतो; मात्र निर्णय घेता आला पाहिजे. आपण कठोर निर्णय करू शकतो हे फडणवीसांनीही दाखवून दिले. सरपंचाच्या हत्येच्या मामल्यात बीड जिल्हाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र त्या



देशमुख कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे या प्रतीक्षेत आहे. त्या न्यायाची वाट प्रशस्त झाली हा विश्वास लोकांना मिळाला आहे. या राजीनाम्यातून एक गोष्ट स्पष्ट दिसली, ती म्हणजे महायुतीत 'देवेंद्र इज द बॉस.'

मात्र पुन्हा अडचण इथेच आहे. एक 'वाल्मीक कराड' असता तर टेन्शन नव्हते. हल्ली राजकारणाचा चिखल झाला आहे. प्रत्येक नेत्याकडे 'एक कराड' आहे. कुणाकुणाला संपवणार? मंत्रिमंडळच रिकामे होण्याचा धोका आहे. रावण एक होता म्हणून प्रभू रामचंद्राला सोपे गेले असावे. मुंडेंना राजीनामा मागून फडणवीसांनी आपल्या ४० मंत्र्यांना मोठा संदेश दिला आहे. स्वच्छ, पारदर्शी कारभार करा हा तो संदेश आणि इशाराही आहे. 'इतके दिवस मुंडेंचा राजीनामा का घेतला नाही' असा सवाल विरोधकांनी केला आहे. पण प्रश्नांना अर्थ नसतो. फडणवीसांनी योग्य वेळ साधली. महाआघाडी सरकारमध्ये गृहमंत्री अनिल देशमुखांवर आरोप सुरू होते तेव्हा शरद पवार त्यांच्या पाठीशी उभे होते. नवाब मलिक जेलमध्ये होते तेव्हा त्यांनी राजीनामा द्यावा असे तेव्हाचे सत्ताधारी म्हणत नव्हते. अटक झाली तरी नवाब मलिक राजीनामा देणार नाही, असे तेव्हा शरद पवार म्हणाले होते. 'तुरुंगात राहून सरकार चालविन' असे अरविंद केजरीवाल म्हणाले होते. मुद्दा हा आहे की, शरद पवार किंवा केजरीवाल जेव्हा हे बोलले तेव्हा आजचे विरोधक कुठे होते? महायुती सरकारला बदनाम करायचा अजेंडा विरोधकांनी हाती घेतलेला दिसतो. धनंजय मुंडे यांची पहिली विकेट घेतली. दुसरा नंबर कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा लावायचा त्यांचा प्रयत्न आहे. सदनिका लाटल्याचा कोकाटे यांच्यावर आरोप आहे. खालच्या कोर्टाने दिलेल्या शिक्षेला नाशिक सत्र न्यायालयाने अपील चालेपर्यंत स्थगिती दिली आहे. इथेच हिट लिस्ट संपत नाही. सातारा जिल्ह्यातले ग्रामविकास मंत्री भाजपाचे जयकुमार गोरे यांच्या शिकारीची तयारी सुरू झाली आहे. अण्णा हजारे यांच्या तक्रारींवर तब्बल सहा मंत्री ओळीने घरी गेले होते. तसले काही सुरू आहे का? राजकारण कमालीचे नासले आहे हे कोणी नाकबूल करणार नाही. पण फडणवीसांनी सावध राहिले पाहिजे. कारण येणाऱ्या रात्री वैऱ्याच्या आहेत.

विरोधकांची पोटदुखी समजू शकते. हे सरकार पडणार नाही. पाडतो म्हटले तरी पडणार नाही एवढे ते भक्कम आहे. मात्र पुन्हा तोच 'फेक नॅरेटिव्ह' खपवण्याची विरोधकांची धडपड सुरू झाली आहे. जमेल तेवढे सरकारची बदनाम करण्याचा एकसूत्री कार्यक्रम सुरू आहे. दुर्दैवाने मीडियाला यात ओढले आहे. एकनाथ शिंदे नाराज असल्याच्या बातम्या ता सरकारच्या पहिल्या दिवसापासून पेरल्या जात आहेत. ''मी नाराज नाही. आमच्यात कुठलेही 'कोल्ड वॉर' सुरू नाही, आमचा 'फेव्हिकॉल'चा जोड आहे,'' हे एकनाथ शिंदे यांनी जाहीरपणे सांगितले तरीही खुटीउपाडपणा सुरू आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना काँग्रेसवाल्यांचे फोन घेत नव्हते. मात्र त्याची कधी ब्रेकिंग न्यूज झाली नाही. आता शिंदे गावाला गेले तरी 'शिंदे नाराज' म्हणून कोल्हेकुई सुरू होते. उद्धव ठाकरेंना संपवण्यासाठी एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री केले गेले. भाजपाची ही मोठी रणनीती होती. वेळ बदलली तर आपल्याला बाजूला व्हावे लागेल याची शिंदे यांना पूर्ण कल्पना नसेल एवढे ते लिंबूटिंबू नाहीत. राजकारणात कोणीही अमरपट्टा घेऊन येत नाही, हे वास्तव शिंदे आता पचवताना दिसत आहेत. देवेंद्र फडणवीस स्वच्छ, पारदर्शक कारभारासाठी आग्रही आहेत. सरकारची प्रतिमा जपण्यासाठी प्रत्येक गोष्टीवर ते बारीक लक्ष ठेवून आहेत. प्रत्येकाला त्याच्या कामाचे 'आऊटपुट' द्यावे लागत आहे. त्यांच्या या 'मोदी अवतारा'ने मित्रपक्षातल्याही काहींची नक्कीच गोची झाली आहे. पण सांगतील कुणाला? पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ते गुजरातचे मुख्यमंत्री असताना वापरलेले मॉडेल फडणवीस इकडे वापरू लागले आहेत. पंतप्रधान कार्यालयात वारंवार येणाऱ्यांवर लक्ष ठेवले जाते. आपल्या मंत्रालयातही तसलीच व्यवस्था झाली आहे. काही जण एक पास काढून अनेक मंत्र्यांना भेटून येत. आता ज्याच्या नावाने पास काढला असेल त्यालाच भेटता येईल. मंत्र्यांचे अधिकारी, पीए नेमतानाही प्रथमच फडणवीसांनी मोठी चाळणी लावली. प्रत्येकाची पृष्ठभूमी तपासली गेली. चुकीच्या कामात अडकलेल्यांना नाकारले गेले. मंत्र्यांनी आपला स्टाफ म्हणून १२५ जणांची नावं पाठवली होती. फडणवीसांनी यातले १६ जण नाकारले. कारण ते 'फिक्सर' होते. आपण आपले घर स्वच्छ ठेवतो, तर मग राज्याचा कारभार जिथून चालतो ते प्रशासन स्वच्छ का असू नये? त्यामुळे तुम्ही पाहाल. मंत्रालयात फालतू गर्दी दिसणार नाही. दलाल दिसणार नाहीत. फडणवीस त्यासाठी आग्रही आहेत. कारण महायुती सरकारचा तेच चेहरा आहेत. म्हणूनच धनंजय मुंडे यांना राजीनामा मागण्याचे नैतिक बळ त्यांनी दाखवले. तुम्ही लिहून ठेवा, फडणवीस असे एकाहून एक दणादण निर्णय घेताना दिसतील.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

# विदर्भ क्रिकेट संघाची कौतुकास्पद कामगिरी

देशांतर्गत स्पर्धेतील अत्यंत प्रतिष्ठेचा असणारा रणजी करंडक विदर्भ क्रिकेट संघाने आपल्याकडे खेचून पुन्हा एकदा कौतुकास्पद इतिहास घडविला आहे. विदर्भ क्रिकेट असोसिएशनने अनेक उत्कृष्ट क्रिकेटपटू तयार केले आहेत. ज्यांनी विदर्भातील क्रिकेट इतिहासात ठसा उमटवला आहे, त्यापैकी चंदू सरवटे, विजय पिंपरीकर, अरुण ओगिरल, विजय तेलंग, अनिल देशपांडे, ही नावे आजही लक्षात आहे. अलिकडील



काळातील नाव म्हटले तर प्रशांत वैद्य याचे येते. अकोला जिल्हा क्रिकेट असोसिएशनद्वारा १९७० ते १९८० दरम्यानच्या काळात अंतर जिल्हा क्रिकेट स्पर्धा आयोजित केल्या जात. त्यावेळी यातील बरेच रणजी खेळाडू नागपूर जिल्हा संघात असायचे. त्यांना पाहण्यास त्या काळात अकोला क्रिकेट असोसिएशनच्या ग्राऊंडवर प्रचंड गर्दी व्हायची. यामधील काही खेळाडूंची नंतर निवड सेंट्रल झोनसाठी व्हायची. विदर्भातील क्रिकेट खेळाडूंमध्ये प्रतिभा पहिल्यापासून होती. पण त्याकाळी रणजी ट्रॉफी जिंकण्याचे सोडा, मध्यप्रदेशाला चांगली लढत दिली तरी कौतुक वाटायचे. विदर्भ क्रिकेट असोसिएशन निवड समिती पदाधिकाऱ्यांनी विशेष लक्ष देऊन चंद्रकांत पंडितांसारख्यांना प्रशिक्षक नेमल्यापासून रणजी ट्रॉफीमध्ये विदर्भाची क्रिकेट टीमसुद्धा असते हे उर्वरित महाराष्ट्राला समजले. भारतीय संघात प्रशांत वैद्य यांची निवड एक दिवसीय सामन्यासाठी होणे ही बाब निश्चित विदर्भासाठी अभिमानास्पद होती. यामुळे एक गोष्ट झाली की, विदर्भातील क्रिकेट प्रतिभावान खेळाडू असतात ही बाब महाराष्ट्राला माहीत झाली. यंदा केरळ क्रिकेट संघाला हरवून विदर्भाने रणजी ट्रॉफी तिसऱ्यांदा आपल्या कडे खेचून आणली आहे ही बाब विदर्भ सारख्या छोट्या प्रदेशाला आणि येथील खेळाडूंना तसेच येथील क्रिकेट प्रेमींना निश्चितच अभिमानास्पद आहे. यासाठी विदर्भ क्रिकेट असोसिएशन अभिनंदनास प्राप्त आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

## वाचक पत्रे

### आपले आप्तेष्ट

मनुष्याचे जीवन हे सुसंस्कारानेच भरले असेल तर जीवनभर सुख-दुःखाला आनंदाने सामोरे जाणे अत्यंत जरूरीचे आहे. सुखात तर आपण रममाण होतोच; पण दुःखातही रममाण होता आलं पाहिजे. दुःखाचे वर्णन आपण करू शकत नाही, पण सुखाचे वर्णन आपण करीत असतो. खरे म्हणजे दुःखातूनच जीवन सावरते. तुकाराम महाराजांनी सुख-दुःखाचे वर्णन सुंदर केलेले आहे. 'दया, क्षमा, शांती तेथे देवाची वसती!' देव अशांच्याच घरात वास करतो. आपले मन, विचार आणि कृती ही परमेश्वराला आनंदीत करणारी असेल तर आपले जीवन धन्य झाले असे वाटते. म्हणून समाजात वावरताना आपण भावंडे आहोत, आपला बंधुभाव प्रेमाने भारला असेल तर आपणावरही सर्वजण प्रेम करायला लागतात. तेव्हा शुद्ध अंतःकरणाने आपण सर्वांना बंधू समजून वागले पाहिजे. अशावेळी आपण एकटे राहात नाही. मी समाजाचा व समाज माझा ही भावना जागृत होते. त्यामुळे जगण्याचा आनंद वाढतो. आपल्यावर प्रेम करणारे आप्तेष्ट नातेवाईक हेच आपल्या जीवनाचे आधारस्तंभ. मनुष्य कितीही मोठा असला, पण आप्तेष्टांचे प्रेमच नसेल तर काय कामाचे? म्हणून आप्तेष्टांच्या प्रेमाने आपुलकीने आपले जीवन कृतार्थ होते.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

### शिवशाही बसमध्ये अपकृत्य

बसमध्ये बलात्कार पहिल्यांदा झाला नाही; यापूर्वीही गुन्हेगार सापडले. परंतु शिक्षेचा पत्ता नाही. त्यांना वेळेवर अंगावर काटा येणारी शिक्षा झाली असती तर कदाचित हे कृत्य घडले नसते. शिवशाही बसमधील गुन्हेगारांचे नाव समजले. त्याला ताबडतोब अटक करून सार्वजनिक ठिकाणी कठोर शिक्षा द्या. सुरक्षा कर्मचाऱ्यांना निलंबित केले हे योग्य आहे. परंतु चालक-वाहकाने बसला बंद का केले नाही? याचीही चौकशी व्हायला हवी. पीडिता सज्ञान असूनही तिने परक्या माणसावर विश्वास कसा ठेवला? बसमध्ये अंधार असताना का चढली? अनेक प्रश्न निर्माण होतात. ही घटना नक्कीच दुर्दैवी आहे. स्त्रियांनी सदैव सतर्क राहायला हवे. आपल्या स्त्रीत्वाची जाणीव ठेवावी. वृथा आत्मविश्वास दाखवू नये. परस्त्री मातेसमान म्हणणाऱ्या शिवाजी महाराजांचे नाव असलेल्या बसमध्ये ही घटना घडली. त्यांत छत्रपतीचा अपमान आहे. तेव्हा नावे ठेवताना त्यांचा अपमान, अवमान होणार नाही याची काळजी घ्यावी.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पुणे १० मार्चपर्यंत फुले कृषी-२०२५ प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या कृषी महाविद्यालय, पुणे येथे फुले कृषी - २०२५ हे कृषी प्रदर्शन ६ ते १० मार्च २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आले आहे.या प्रदर्शनात शेतकऱ्यांसाठी विविध तंत्रज्ञान, संशोधन आणि आधुनिक कृषी पद्धतींचे सादरीकरण केले जाणार आहे. प्रदर्शनाच्या ७ ते ९ मार्च २०२५ या कालावधीत शेतकरी उत्पादक संस्था मेळावा देखील आयोजित करण्यात आला आहे.

केंद्र शासनाच्या १० हजार शेतकरी उत्पादक संस्था स्थापना व बळकटीकरण योजनेअंतर्गत उत्तम कार्य करणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्थांचा या मेळाव्यात सहभाग राहणार आहे.त्यांचे उत्पादन प्रदर्शन आणि विक्रीसाठी उपलब्ध राहणार असून,शेतकऱ्यांसाठी शेतकरी उत्पादक संस्थेसंदर्भात मार्गदर्शन व चर्चासत्र आयोजित केले आहे. देशामध्ये प्रथमच रासायनमुक्त शेतीचे प्रात्यक्षिक व प्रदर्शन आयोजित करण्यात आले असून,शेतकरी उत्पादक संस्थांसाठी आणि नवीन शेतकरी उत्पादक संस्था स्थापन करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हे प्रदर्शन मार्गदर्शक ठरेल.राज्यातील सर्व शेतकरी बांधवांनी या प्रदर्शनाचा आणि मेळाव्याचा लाभ घ्यावा,असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.



## राजकारणाच्या पलीकडे मंदिर संवर्धन जतन आवश्यक : छत्रपती संभाजी राजे

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ मार्च -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मंदिर हे पुरातन ऐतिहासिक असून या मंदिराचे पुरातन जपण्याची गरज आहे. मंदिरचे शास्त्र युक्त पद्धतीने जतन आणि संवर्धन होण्यासाठी मी आजचा दौरा हा केला आहे असे मंदिर प्रशासकीय कार्यालयात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये छत्रपती संभाजी राजे यांनी सांगितले.



तुळजापूर शहरात छत्रपती संभाजी राजेंच आगमन होताच फटाक्यांची आतिषबाजी तुळजापूरकरांच्या वतीने करण्यात आली. देवी दर्शनानंतर पत्रकार परिषद घेऊन मंदिराच्या विकासाबाबत त्यांनी आपले मत व्यक्त केले. यावेळी त्यांच्यासोबत रायगड येथील प्राधिकरण समितीचे सदस्य उपस्थित होते.

छत्रपती संभाजी राजे यांचा मंदिर संस्थान कार्यालयात मंदिर संस्थांच्या वतीने तहसीलदार अरविंद बोळंगे यांनी देवीचे प्रतिमा सत्कार केला. श्री तुळजाभवानी मंदिर चा विकास होणे गरजेचे आहे पण यामध्येही विकास होताना मंदिरचे पुरातन जपणं तेवढेच गरजेचे आहे.तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मंदिरची प्राचीनता दिसली पाहिजे. नवीन आणि लेटेस्ट पणा आणण्यापेक्षा जुनं जपता आलं पाहिजे. साडेतीन शक्तीपीठातील एक पूर्ण पीठ असणारे हे मंदिर आहे.

काही दिवसापूर्वी एक टीम पाठवून मंदिराचे पाहणी केली त्यांनी मला अहवाल दिला अहवाल पाहुन मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली आहे. मंदिरातील शिळांना जरी तडे पडले असले तरी त्याचं निरंतर होऊ शकते. मग तुम्हाला शिखर उतरायची काय गरज आहे. शिखराच्या विटा सुध्दा प्राचीन आहेत. केंद्राची टीम बोलून राज्यातील पुरातन विभागाने अहवाल दिला असला तरी काही गडबडीत कुठलाही निर्णय न घेता केंद्रीय पुरातन विभागाचे टीम बोलावून त्यांचा देखील अहवाल घेणे गरजेचे आहे. यावेळेस मंदिर संस्थांचे तहसीलदार अरविंद बोळंगे धार्मिक व्यवस्थापक अमोल भोसले, मंदिर संस्थानचे कर्मचारी जयसिंग पाटील, विश्वास कदम,, रवींद्र भराटे,अनिरुद्ध देशपांडे, अभिजीत तेरखेडकर, पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमर परमेश्वर,अण्णासाहेब क्षीरसागर, अजय साळुंके,जीवन इंगळे, अमोल कुतवळ, कुमार टोले, महेश गवळी, महेश चोपदार, सत्यजित साठे, प्रवीण कदम, विकास मलबा इत्यादी उपस्थित होते.

## आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या निवडीबद्दल तुळजाभवानीस महाआरती

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ मार्च -**



केंद्र सरकारच्या नीति आयोगाच्या धर्तीवर स्थापन केलेल्या 'महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन' अर्थात 'मित्र' या राज्याची आर्थिक व धोरणात्म क दिशा ठरविणाऱ्या महत्वपूर्ण संस्थेच्या उपाध्यक्षपदी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची निवड झाल्याबद्दल तुळजाभवानी मंदिरासमोर महाआरती करण्यात आली. आरती केल्यानंतर फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला

यावेळी तुळजाभवानी दूध संघाचे चेअरमन बाबासाहेब शिंदे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद कंदले, माजी नगरसेवक सुहास साळुंके, औदुंबर कदम, अविनाश गंगणे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष संदीप गंगणे, तालुका सरचिटणीस शिवाजी बोधले, शहराध्यक्ष शांताराम पेंदे, शहर सरचिटणीस धैर्यशील दरेकर, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष राजेश्वर कदम, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष राम चोपदार, उमेश गवते, ऋतुराज भोसले, रोहित चव्हाण, समर्थ पैलवान, शुभम बागल यांची उपस्थिती होती.

## स्त्री जन्मा तुझी कहाणी... तु जगाची उद्धारी,तूच जगत जननी!

### जागतिक महिला दिन विशेष

स्त्रीची अनेक रूपे आहेत पुर्ण विश्वाला व्यापून टाकणारी स्त्री विधात्याने स्त्रीला दिलेले अनण्य साधारण महत्त्व . स्त्री म्हणजे ईश्वर आणि आत्मा यांचे मिलन ,विश्वनिर्मिती हे सर्व असुनही ती अबला ! महाभारतापासून स्त्रीचा वापर केला गेला. तिच्याकडून प्रचंड अपेक्षा केल्या गेल्या.

जन्माला आल्या पासून अंतापर्यंत अपेक्षा पूर्ण करता करता स्त्री आपले अस्तित्व विसरून गेली. मुलगी म्हणून आईवडिलांची,पत्नी म्हणून पती समाज कुटुंबातील सदस्यांच्या अपेक्षा.

आई झाली की, मुलांच्या अपेक्षा हे सर्व करताना स्वतः च्या अस्तित्वाचा विचार कधी तिने केला ? स्त्री तु खरचं खुप भाग्यवान आहेस.कारण तुझ्याशिवाय हे विश्व अपुरे आहे. ज्या राष्ट्राच्या मातीत मैत्रिय गार्गीय मदर तेरेसा यासारख्या जन्माला आल्या ते राष्ट्र भाग्यवानचं

एवढेच नव्हे तर स्त्री खुप भाग्यशिल आहे त्यामुळे अनेकांचे संसार साधत आहे. नाहीतर पाश्चात्य संस्कृतीने सकाळी लग्न आणि संध्याकाळी घटस्पोट झाला असता. पण आज गरज आहे स्त्री जागृतीची,डोळस पणे जगण्याची आपले अस्तित्व शोधण्याची प्रथम स्त्री ने आपल्या स्त्रीत्वाचा अभिमान बाळगायला पाहिजे.मुलगी जन्माला येण्यापासून रोखु नये यामुळे समाज संतुलन राहिले.

स्त्रीला समाजात वावरणे समाज सुरक्षित होईल .

प्रचलित समाजाने स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवले. पण सावित्रीबाई फुले यांच्या कतृत्वाने स्त्री शिक्षणाची दारे खुली झाली. समाजात प्रत्येक क्षेत्रात दिवसंदिवस प्रगती होत आहे. गतिमान होऊन देशाच्या प्रमुख पदावर स्त्री विराजमान झाली. समाजामध्य अबला म्हणाऱ्या स्त्रीने शेतीपासून अवकाशापर्यंत मजल मारली.

पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन स्त्री समाजात वावरत आहे. पण स्त्री खऱ्या अर्थाने मुक्त झाली का? स्त्रीने आज जागे व्हावे व प्रचलित कर्म समाजबंधाने झुंगारून आपल्या स्त्री मुक्तीचा झंझावत सुरु करावा.

स्त्री मुक्ती म्हणजे काय ? हे प्रथम जाणावे पँटशर्ट घालून अवेळी घराबाहेर पडणे किंवा घरी येणे म्हणजे स्त्री मुक्ती नव्हे. शिक्षणाच्या नावाखाली गैरमार्गाने जाणे.

आधुनिकतेच्या नावाखाली घरातील मोठ्या माणसांचा अपमान करून कुटुंबस्वाथ्य प्रेम बिघडून पार्टी सभा करणे म्हणजे नवीन विचार,आदर्श जोपासणे ? शिक्षणाबरोबर नम्रता , संस्कार संस्कृती जोपासना करून अंधश्रद्धा झुंगारून नवीन विचार स्वीकारणे म्हणजे मुक्ती होय!

**- राजश्री कुटे-मुंढे**
**जि.प.प्रा.शाळा चोराखळी**

## शरणाप्पा धरणे यांचे निधन

**जळकोट, दि.७ मार्च -**



तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील रहिवासी सेवानिवृत्त मुख्याध्यापक शरणाप्पा सांबप्पा धरणे (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने शुक्रवार (दि.७) रोजी सकाळी ७.४५ वाजण्याच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ५ वाजण्याच्या सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ पत्नी, भावजय असा परिवार आहे. शरणाप्पा धरणे यांनी शिक्षक, सहशिक्षक व मुख्याध्यापक या पदावर सेवा बजावली होती. जळकोट, नळदुर्ग येथील धरणे उद्योग समूहाचे धरणे ब्रदर्स यांचे ते काका होत. जळकोट येथील शिवराज, ओंकार आळंगे यांचे ते मावस काका होत.

## एक पाऊल नव्या बदलाकडे



**अनिता निकते**
**९११२२४२०११**

८ मार्च जागतिक महिला दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा या दिनानिमित्त समाजातील यशस्वी महिलांचा सन्मान केला जातो. जेणेकरून बाकीच्या महिलांना प्रेरणा मिळेल महिला सक्षम बनेल. ती स्वतः स्वावलंबी बनेल शारीरिक आर्थिक मानसिक दृष्ट्या सक्षम बनेल.

महिला सबलीकरण हे झालेच पाहिजे पण कोणी असा विचार केलाय का की समाजात अशा काही एकल महिला आहेत त्यामध्ये विधवा, परितकता घटस्फोटीत मुलींचे वयात आल्याबरोबर लग्न करून देतात, काहींचे दुर्दैवाने तीन-चार वर्षामध्ये पती मरण पावतात, व ती विधवा होते त्या महिलेचा काहीही दोष नसताना तिला समाजात तिला वेगळी वागणूक दिली जाते, काही भागात तर एकलं ना बोलण्याची पद्धतच बदलते, ते विधवा, रांडव, पांढऱ्या कपाळाची, नवऱ्याला गिळून बसलेली, असे शब्द वापरले जातात अशावेळी तिच्या मनावर काय आघात होतो याचा विचार केलाय कुणी? लग्नाआधी त्याच मुलीला कुमारिका म्हणून सुहासिनीचा मान मिळायचा तिच्या डोक्यावर अक्षदा पडल्या आणि तिचा काहीही दोष नसताना तिचा पती मरण पावला, तिचा यात काय दोष तिच्याबद्दलची समाजाची मतेच बदलली, हे कुठेतरी थांबले पाहिजे.

एकीकडे आपण महिला सक्षम झाली पाहिजे यासाठी प्रयत्न करतो आणि दुसरीकडे आपणच आपल्या बहिणी समान असणाऱ्या एकल विधवा महिलांचा समाजात दुजाभाव करतो, अगोदर सती जाण्याची प्रथा होती आता ती बंद झाली, आता सध्या त्या मुलीचा पती वारला ती विधवा झाली की तिच्या गळ्यातील मंगळसूत्र तोडतात, पायातली जोडवे काढतात बांगड्या फोडतात, कपाळावरचे कुंकू पुसतात, इतकच नाही तर तिला कोणत्याच समारंभा मध्ये जसे लग्न समारंभ, पूजा, हळदी कुंकू अश्या ठिकानी मान देत नाहीत, हे सर्व तिच्यासोबत करत असताना तिच्या मनावर काय आघात झाला असेल याचा विचार केलाय कोणी? समाजाला तिचा मन दुखवण्याचा काय अधिकार आहे, या तिचा काय दोष ती मंगळसूत्र घालू शकत नाही कुंकू लावू शकत नाही, नाकात नथ घालू शकत नाही,गजरा घालू शकत नाही, अशी बंधने तिच्यावर लादली जातात, प्रत्येक स्त्रीला शृंगार करण्याचा अधिकार आहे, देवाने नाक दिले ते नथ घालण्यासाठी, लांब केस दिले ते गरजा घालण्यासाठी तुला शृंगार करण्याचा नटण्याचा अधिकार आहे, तिच्या जागी स्वतःला उभे करून बघा मग तुम्हाला तिच्या भावना तिच्यावर झालेला आघात समजेल, विधवा म्हणून जीवन जगणे किती अवघड आहे.

इतकच नाही तर ती जगाच्या वाईट नजरा अवतीभवती असतात स्वतःच्या सुरक्षेसाठी जर तिने सर्व अलंकार घातले कुंकू लावले, मंगळसूत्र घातले तअसा काय गुन्हा केला तिने म्हणून समाज तिच्याकडे संशयाच्या दृष्टीने पाहतो, समाजात चालणारी ही अंधश्रद्धा रूढी परंपरा यावर आळा बसलाच पाहिजेत, यासाठी मला सर्वांच्या सहकार्याची गरज आहे, आपण म्हणतो महिलांचे सक्षमीकरण झाले पाहिजे मग विधवा एकल महिलांचे काय? त्यांचे मानसिक खच्चीकरण होते त्याचे काय? आज आपली महिला खरच सक्षम आहे का? तिला मानसिक सक्षम करण्याची गरज आहे, छोट्या छोट्या मुलांचा सांभाळ करणे त्याचबरोबर स्वतः मनाने खंबीर होऊन या समाजात वावरणे किती कठीण असते, त्यात या अशा अंधश्रद्धा रूढी परंपरा आपण सर्वजण मिळून समाजाचे काहीतरी देणे लागतो एक सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन एकल महिलांच्या समस्येवर आपण काम करून त्यांना समाजामध्ये इतर महिला प्रमाणे सर्व अधिकार व मान मिळवून देऊयात. या आठ मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विधवा महिलांच्या मनावर आघात करणाऱ्या अंधश्रद्धा रूढीपरंपरा,चालीरीती यावर आळा घालून, माणसातल्या माणूसपणाची जाण व भान ठेवून एका नव्या बदलाकडे वाटचाल करूयात व महिलांना खऱ्या अर्थाने सक्षम बनवण्याचा मानस निर्माण करूयात, त्यासाठी सामाजिक बांधिलकी असणाऱ्या व्यक्ती व ग्रामपंचायत यांनीही पुढाकार घेऊन सहकार्य करावे.

## मुरूम ग्रामीण रुग्णालयात स्वतंत्र विद्युत रोहित्र बसवण्याची गरज

### यंत्रसामुग्री असूनही विजेअभावी बंद

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.७ मार्च -**

मुरूम (ता.उमरगा) येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयाला अत्यंत कमी दाबाने व अनियमित वीज पुरवठा होत आहे. त्यामुळे रुग्णालयातील क्ष-किरण यंत्र ,लसीचे फ्रिजर, रक्तदाब तपासणी मशीन व इतर विद्युत उपरकणे बंद राहत आहेत शिवाय संगणकीय कामकाज देखील रखडत आहेत. या रुग्णालयासाठी उच्च दाबाचे स्वतंत्र विद्युत रोहित्र कार्यान्वित करणे गरजेचे आहे.विशेष म्हणजे याबाबतची मागणी रुग्णालयाच्यावतीने संबधित विभागाला करण्यात आली आहे. मात्र अद्यापही या समस्याचे निराकरण होत नसल्याने रुग्णालयाचा कारभार ढेपाळत चालला आहे.



मुरूम शासकीय ग्रामीण रुग्णालयाला यशवंतनगर येथील ज्ञानदान डीपी येथून वीज पुरवठ्याची जोडणी आहे.या डीपीवर इतर असंख्य वीज जोडणी असल्याने रुग्णालयाला आवश्यकतेनुसार उच्च दाबाचे वीज पुरवठा होत नसल्याचे दिसून येते. शिवाय विद्युत रोहित्रमध्ये सतत तांत्रिक बिघाड होत असल्याने रुग्णालयातील वीज पुरवठा वारंवार बंद पडत आहे.

अशा प्रकारामुळे रुग्णालयातील क्ष - किरण यंत्र, लॅब टेस्टिंग,रक्तदाब तपासणी मशीन व इतर विद्युत उपकरणाद्वारे रुग्ण सेवा देण्यात अडचणी येत आहेत तसेच संगणकाद्वारे कार्यालयीन अहवाल तयार करणे,पोर्टल अपडेट करणे, रुग्णसेवा संबधीचे ऑनलाइन सेवा देण्यावर विलंबपणा लागत आहेत.

रुग्णसेवेसाठी आवश्यक उपकरणे उपलब्ध असतानाही केवळ अनियमित आणि कमी दाबाच्या वीज पुरवठयामुळे रुग्णांना सेवा देण्यात अडचणी येत आहेत त्यामुळे रुग्णालयासाठी स्वतंत्र विद्युत रोहित्र कार्यान्वित करणे गरजेचे आहे.

रुग्णालयात रुग्ण सेवेसाठी अनेक यंत्रसामुग्री आहेत मात्र कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने यंत्र सामुग्री बंद पडत आहेत. त्यामुळे रुग्ण सेवा देण्यात अडचणी येत आहेत.

रुग्णालयासाठी स्वतंत्र विद्युत रोहित्र कार्यान्वित असणे आवश्यकता आहे. यासाठी रुग्णालयमार्फत महावितरणकडे वर्षांपूर्वी लेखी पत्र देऊन मागणी करण्यात आली आहे. मात्र अद्याप कार्यवाही झाली नाही, असे मुरूम ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.एम.एम.अरदाले यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

## मारहाणप्रकरणी दोन वेगवेगळ्या ठिकाणी गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

जिल्ह्यातील वाशी आणि परंडा पोलीस ठाण्यांत दोन वेगवेगळ्या मारहाणीच्या घटनांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दोन्ही प्रकरणांमध्ये संबंधित आरोपींनी किरकोळ कारणांवरून शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व हत्यारांचा वापर करून मारहाण केल्याची घटना घडली आहे.

वाशी तालुक्यातील मांडवा येथे २ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता दिलीप सुब्राव शिंदे (रा.मांडवा, ता.वाशी) यांनी फिर्यादी पूजा रामकिसन शिंदे (वय४०) यांच्यासह त्यांच्या पती व मुलीला पाहुण्यांचे पैसे का दिले नाहीत व दाखल केलेले प्रकरण का मिटवले नाही, यावरून वाद घातला. यानंतर आरोपीने शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केली. इतकेच नव्हे, तर पूजाबाई यांना लाकडाने मारहाण करून गंभीर जखमी केले आणि त्यांना ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी ६ मार्च २०२५ रोजी वाशी पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम ११८(२), ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परंडा तालुक्यातील माणकेश्वर येथे ३ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता रामराजे अभिमान मस्तुद (रा. माणकेश्वर, ता. भूम) यांनी फिर्यादी सागर सुरेश पवार (वय २९) यांना किरकोळ कारणावरून मारहाण केली.

सागर पवार हे आरोपीच्या चप्पलच्या दुकानासमोर बसले होते, यावरून आरोपीने शिवीगाळ केली आणि दगड व लाथाबुक्यांनी मारहाण करून त्यांना जखमी केले. या घटनेबाबत फिर्यादीने ६ मार्च २०२५ रोजी परंडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, भारतीय दंड संहितेच्या कलम ११८(१), ११५(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या दोन्ही घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## स्वाधार योजनेस अर्ज करण्यास १५ मार्चपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ मार्च २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या किंवा प्रवेश न घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील इयत्ता ११ वी, १२ वी तसेच व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सुविधांसाठी भोजन भत्ता, निवास भत्ता, निर्वाह भत्ता आणि इतर शैक्षणिक मदत दिली जाते. विद्यार्थ्यांचे उशिरा सुरू होणारे शैक्षणिक सत्र आणि ऑनलाइन अर्ज करताना उद्भवलेल्या तांत्रिक अडचणी लक्षात घेता, स्वाधार योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्यात आला आहे. त्यामुळे योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत १५ मार्च पर्यंत वाढविण्यात आली आहे. धाराशिव नगरपालिका तसेच सर्व तालुका नगरपालिका, नगरपरिषद हद्दीतील महाविद्यालयातील पात्र विद्यार्थी ज्यांनी अद्याप अर्ज सादर केलेला नाही, त्यांनी १५ मार्च पूर्वी अर्ज सादर करावा व योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, धाराशिव यांनी केले आहे.

## गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवारामुळे निर्माण होतेय जलसंधारणाचे नवयुग

जलसंधारणाच्या दिशेने महाराष्ट्र शासनाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना त्याच दिशेने टाकलेले ठोस पाऊल आहे.या योजनेचा मुख्य उद्देश जलसाठ्यात साचलेला गाळ काढून पाणीसाठ्याची क्षमता वाढविणे आणि तो गाळ शेतीसाठी उपयुक्त बनवणे हा आहे. विशेषतः लहान व अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना या योजनेचा मोठा फायदा होत आहे.

या योजनेचे वैशिष्ट्ये म्हणजे या योजनेत शेतकऱ्यांचा सहभाग असून आणि त्यांना गाळ काढून शेतात टाकण्यासाठी अनुदान देखील देण्यात येत आहे अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात गाळ वाहून नेण्यासाठी अनुदान देण्यात येते.बहुभूधारक शेतकऱ्यांनी मात्र गाळ वाहून नेण्याचा खर्च स्वतः ला करावा लागतो.यंत्रसामग्री आणि इंधनाचा खर्च शासन निधीतून करण्यात येतो.

ग्रामपंचायत आणि अशासकीय संस्थांच्या मदतीने या योजनेबाबतची जागृती आणि माहिती संकलनाची जबाबदारी पूर्ण करण्यात येते.या योजनेत अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून काम करण्यात येत आहे.

अवनी ॲप च्या माध्यमातून जीओटॅगिंग,फोटो-व्हिडिओ रेकॉर्डिंग आणि माहितीचे संकलन केले जात आहे.

शेतकरी,वाहतूक साधने,गाळाचे प्रमाण आणि यंत्रसामग्रीच्या कामाच्या तासांची नोंद केली जाते. योजनेच्या प्रभावाचे मूल्यमापन दोन पावसाळ्यानंतर करण्यात येते. जलसाठ्यात वाढ,उत्पादन,उत्पन्न आणि जीवनमान सुधारण्यावर आधारित निष्कर्ष नोंदवले जातात.

या योजनेत १० वर्षांपेक्षा जुन्या जलसाठ्यांना प्राधान्य देण्यात येत आहे.६०० हेक्टरपेक्षा कमी लाभक्षेत्र असलेल्या जलसाठ्यांचा गाळ प्रथम काढण्यात येत आहे.त्यासाठी जिल्हा जलसंधारण अधिकारी हे वार्षिक आराखडा तयार करून शासनाची मान्यता घेतात. १ हेक्टरपर्यंत जमीन असलेल्या अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना आणि १ ते २ हेक्टर असलेल्या लहान शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्राधान्य दिले जाते. विधवा,दिव्यांग आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी या योजनेच्या अनुदानासाठी पात्र आहे

प्रति एकर १५ हजार रुपये अनुदान दिले जाते.(कमाल ३७ हजार ५०० पर्यंत).विधवा,दिव्यांग आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत ही सवलत लागू आहे.

या योजनेअंतर्गत काढण्यात येणाऱ्या गाळाची विक्री किंवा इतर कारणांसाठी वापर करता येत नाही.

जलसाठ्यांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (उझठ) तयार करून समितीकडे पाठविण्यात येतो. जलसाठ्याचे फोटो आणि व्हिडिओ जिओटॅगिंगसह नोंदवले जातात.गाळ काढण्यापूर्वी आणि काढल्यानंतरची माहिती अवनी ॲपवर अपडेट केली जाते.या योजनेचे अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते.

डीबीटी (उझढ) प्रणाली कार्यान्वित होईपर्यंत ग्राम पंचायतीकडून शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येते. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना राज्यातील जलसंधारण व्यवस्थापनासाठी क्रांतिकारी ठरणार आहे. जलसाठ्यांची पाणी साठवण क्षमता वाढवून आणि गाळाचा योग्य वापर करून शेतकऱ्यांचे उत्पादन, उत्पन्न आणि जीवनमान उंचावण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरणार आहे. शासनाच्या योग्य नियोजन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने ही योजना यशस्वी होईल आणि पाण्याची समस्या काही प्रमाणात सुटण्यास मदत होणार आहे.

**संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय**
**धाराशिव**

## संक्षिप्त वृत्त...

### अन्नधान्याऐवजी थेट रक्कम योजनेतंर्गत शेतकरी शिधापत्रिकाधारकांच्या बँक खात्यात जमा होणार एक कोटी वीस लाखाची रक्कम

**पूर्णा,/प्रतिनिधी :** तालुकयातील एपीएल शेतकरी शिधापत्रिकाधारक लाभार्थी योजनेअंतर्गत ज्या शेतक-यांच्या नावे सातबारा आहे व ज्यांना स्वस्त धान्य दुकानदारांकडून स्वस्त धान्य मिळत होते अशा लाभार्थ्यांसाठी शासनाकडून कुटुंबातील महिलांच्या नावे असलेल्या बँक खात्यात डीबीटी म्हणजेच थेट रक्कम हस्तांतरणद्वारे अन्नधान्यापोटी मिळणारी रक्कम जमा करण्याबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात आलेला .

पूर्णा तालुक्यातील एकूण ७३३८ कार्डधारक व लाभार्थी सदस्यसंख्या ३१३८३ इतकी असून त्यापैकी एकूण ५४२५ शिधापत्रिकांमधील एकूण २३६६७ इतक्या लाभार्थ्यांना माहे एप्रिल-२०२४ ते जून-२०२४ या कालावधीतील प्रतिसदस्य १७० याप्रमाणे एकूण १,२०,७०,१७०/- (एक कोटी वीस लाख सत्तर हजार एकशे सत्तर) इतकी अनुदानाची रक्कम मंजुरीसाठी वरिष्ठ स्तरावर पाठविण्यात आली असून मंजुरी मिळताच सदर रक्कम लवकरच कार्डधारकांच्या खात्यात जमा करण्यात येणार .

तसेच ज्या उर्वरित १९१३ शेतकरी शिधापत्रिकाधारकांना अद्याप सदर योजनेअंतर्गत लाभमिळालेला नाही अशा लाभार्थ्यांनी आपले कुटुंबाचे राशन कार्ड, कुटुंबसदस्यांचे आधार कार्ड, महिला कुटुंब प्रमुखाचे नावे असलेले बैंक पासबुक या कागदपत्रांच्या छायांकित प्रत व मोबाईल क्रमांकासह स्वस्त धान्य दुकानदार यांचेकडे अथवा पुरवठा विभाग तहसील कार्यालय, पूर्णा येथे जमा करण्याबाबतचे आवाहन तहसीलदार माधव बोधीकर, नायब तहसीलदार सतीश नाईक, पुरवठा निरीक्षक प्रदीप मोरे यांनी केले .

### सेलूतील प्रिन्स इंग्लिश स्कूलची शैक्षणिक सहल



**सेलू,/प्रतिनिधी :** येथील श्रीराम प्रतिष्ठानचा एल. के. आर. आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूलतर्फे शालेय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पर्पल कॅपप्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल उत्साहात पार पडली.

इयत्ता पहिली ते नववीचे अरनेश नाईकनवरे, रिधान जोगदंड, माधवी साळुंखे, रिद्धी दासालकर, प्रियाल बेनवाड, तनुश्री जाधव, समर्थ सुरवसे, समृद्धी सुरवसे, प्रज्वल रोडगे, आशिष रोडगे, प्रेरणा कास्टे, उन्नती राठी, आरव कुमार, शिवम फाटे, गौरी अबूज, प्रियल राठोड, तेजश्री चौधरी, तत्वमसी शिंदे, अभिराज मोगल, समर्थ मगर, वरद कुटे, सानवी मरेवार, हर्षल जाधव अजित झाडे, अनिकेत आंबेकर, श्रीनिवास पाटील, तनिष्का तेलभरे, क्षितिजा खजिने या विद्यार्थ्यांचा सहभाग . वेरूळ लेणी, श्री घृष्णेश्वर मंदिर, त्र संभाजीनगर या ठिकाणी शैक्षणिक सहल उत्साहात पार पडली. शैक्षणिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांच्या हस्ते एका पंचतारांकित हॉटेलात विशेष मेजवानी देऊन विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी डॉ. सविता रोडगे, प्राचार्या कार्तिक रत्नाला यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❏ दैनिक ❏ वेबसाईट ❏ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## महिला दिनी पाथरीत होणार आरोग्य तपासणी मोहिम



**पाथरी,/प्रतिनिधी:** -शहरातील सुमनांजली हॉस्पिटल येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून डॉ भाले यांचे सुमनांजली हॉस्पिटल,शिवनेरी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल परभणी आणि मानवत मल्टी स्पेशालीटी हॉस्पिटल यांच्या सौजन्याने शनिवार ८ मार्च रोजी मधुमेह, डायबेटीज, बी.पी व -हदयरोग रुग्णांकरीता आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती डॉ अतुल भाले यांनी दिली. या आरोग्य शिनबिरात मधुमेह असणा-या रुग्णांना भविष्यामध्ये हृदय व किडनीचे आजार जडण्याची जास्त शक्यता असते. उदा. रक्तातील चरबीचे प्रमाण वाढुन हृदयाचा झटका येणे, किडनीद्वारे प्रथीने जाऊन किडनी खराब होणे, तसेच हातापायांच्या नसा कमजोर होऊन बोथटपणा किंवा मुंग्या येणे, अशा प्रकारचे वेगवेगळे आजार जडतात.

तरी त्या आजाराची काळजी आजार होण्यापुर्वीच घेतली तर भविष्यातील संभाव्य धोके टळतात. त्याकरिता निरनिराळ्या तपासण्या तसेच इ.सी.जी. करणे आवश्यक असते व वेळोवेळी या तपासण्या करण्यास भरपुर खर्च होतो. त्याकरिता डॉ. भाले यांचे सुमनांजली हॉस्पिटल तर्फे सर्व तपासणी शिबीर रविवार दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी आयोजित करण्यात आले असल्याची माहिती डॉ भाले यांनी दिली.

यावेळी जेवना पुर्वी रक्त तपासणी,जेवना नंतर रक्त तपासणी,रक्तातील चरबीचे प्रमाण,इसीजी,रक्तदाब तपासणी व आरेग्यावर चर्चा आणि उपचार,सहभागी व्यक्तींशी रिपोर्ट बद्दल सविस्तर चर्चा. होणार असल्याचे डॉ भाले म्हणाले. या शिबिरात सहभागी होण्या साठी नोंदनी आवश्यक असून नाम त्र शुल्क दोनशे रुपये आकारण्यात येणार . या वेळी मधुमेह रुग्णांसाठी जेवनाची व्यवस्था करण्यात आल्याचे ही ते म्हणाले. शहरातील उपविभागिय कार्यालया बाजूला असलेल्या सुमनांजली हॉस्पिटल येथील या आरोग्य शिबिराचा लाभ गरजूंनी घेण्याचे आवाहन डॉ अतुल भाले यांनी केले .

# मागितले ९९३ कोटी, मिळाले ३५० कोटी

## एसटीला निधी देतांना सरकारचा हात आखडता, अपुरा निधी देवून कर्मचाऱ्यांची थट्टा

### श्रीरंग वरगे यांचा आरोप

**पाथरी ,/प्रतिनिधी:-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला दर महिन्याला सरकारकडून विविध सवलतीची प्रतिपूर्ती रक्कम येतअसते.व त्यातून कर्मचाऱ्यांना वेतन दिले जाते. पण गेले अनेक महिने ही रक्कम अपूर्ण येत असल्याने कर्मचाऱ्यांची पी. एफ., ग्राज्यूटी , बँक कर्ज व इतर सर्व देणी थकली असून आता या महिन्यात सुद्धा फक्त ३५० कोटी रुपये इतकी रक्कम देण्यात आली असल्याने व मागणीच्या तुलनेत ही रक्कम कमी असल्याने आता पुन्हा कर्मचाऱ्यांची इतर देणी थकीत राहणार आहेत.व या महिन्यात सुद्धा कर्मचाऱ्यांना पुन्हा नक्त वेतन मिळणार आहे .हे खेदजनक असून सरकार कडून कर्मचाऱ्यांची वारंवार थट्टा केली जात असल्याचा आरोप ट एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला . बरगे हे आज पाथरी येथे आले असताना ट एसटी कर्मचारी काँग्रेसच्या, पाथरी आगार युनिटच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पाथरी येथील , संस्कार महाविद्यालय, येथे झालेल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलत . डिसेंबर २०२४ अखेर महामंडळाकडून सुमारे ३२६० कोटी रुपयांची देणी थकली असल्याचे फेब्रुवारी मध्ये सरकारला कळविण्यात आले असताना व एकूण ९९३. ७६ कोटींची गरज असल्याचे स्पष्ट केले असताना सुद्धा या महिन्यात फक्त ३५० कोटी रुपये इतकी रक्कम सरकार कडून देण्यात आली आहे.हे दुर्दैवी असून दीर्घकालीन संपाच्या काळात शासनाने नेमलेल्या त्रि सदस्यीय समितीने उच्च न्यायालयात दिलेल्या शपथपत्राचा भंग करण्यात आला . संपाच्या काळात शासनाने खर्चाला कमी पडणारी आवश्यक रक्कम देण्याचे उच्च न्यायालयात स्पष्ट कबुल केले . त्यालाही हरताळ फासण्यात आला असल्याचेही बरगे यांनी या वेली बोलताना सांगितले.

एसटी वापर फक्त जनतेची सहानुभूती मिळविण्यासाठी सरकारने एसटी कर्मचाऱ्यांना न्यायालयात शब्द देऊन सुद्धा फसवले असून प्रवाशांची सुद्धा दिशाभूल करण्यात आली . जनतेची सहानुभूती मिळविण्यासाठी वृद्ध महिला आणि समाजातील विविध घटकांना सवलती दिल्या असून त्याची प्रतिपूर्तीची पूर्ण रक्कम एसटीला देण्यात येत नाही.ही निव्वळ दिशाभूल असून जनतेची सहानुभूती मिळविण्यासाठी एसटीचा वापर केला जात आहे .दर महिन्याला साधारण ३६० ते ३८० कोटी रुपये इतकी सवलत मूल्य रक्कम होत असताना या पूर्वी महिन्याला सुमारे ३०० कोटी रुपये व आता गेले दोन महिने ३५० कोटी रुपये इतकी रक्कम सरकार कडून देण्यात आली . सरकार कर्मचाऱ्यांची व प्रवाशी जनतेची अशी दोघांचीही फसवणूक करीत असल्याची टीकाही बरगे यांनी या वेळी केली.

परिवहन मंत्रांनी लक्ष द्यावे शासनाच्या अर्थ खात्याकडून एसटीला निधी उपलब्ध करून देण्यात टाळाटाळ केली जात असून एसटीच्या निधी मागणीच्या पत्राला केराची टोपली दाखवली जात . यात राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विशेष लक्ष घालून एसटी व अर्थ खाते यांची संयुक्त बैठक घेऊन तोडगा काढला जावा अशी मागणीही बरगे यांनी या बोलताना केली. पाथरी येथे झालेल्या या बैठकीला संघटनेचे केंद्रीय उपाध्यक्ष वसंतराव बोराडे,प्रादेशिक सचिव बालाजी ढेपे, परभणी विभागाचे विभागीय अध्यक्ष देविदास जटाळे, विभागीय सचिव संतोष भराड , माऊली मुंडे, प्रताप शेळके, रमेश सोनवणे, अनंत मांगुळकर, धनराज गीते, तुकाराम पुंगळे,प्रकाश सोळंके व भरपुर कर्मचारी उपस्थित होते. आदी पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सेलू, सोनपेठवासियांना पाळला शांततेत बंद





**अनिल चव्हाण**

**सेलू/सोनपेठ/प्रतिनिधी-** मस्साजोग चे सरपंच स्वर्गीय संतोष देशमूख यांची निर्घूण हत्या करण्यात आली या हात्येतील मूख्यसूत्रधार वाल्मिक कराड व त्याचे साथीदार तसेच धनंजय मूढे यांना सहआरोपी करून कडक शासन करण्याच्या मागणी साठी शूक्रवार ७ रोजी सकल मराठा समाजाच्यावतिने सेलू बंद पूकारण्यात आला होता सदरिल बंद शांततेत पार पडला.

स्व.संतोष देशमूख हत्येतील मूख्य आरोपी वाल्मिक कराड व त्याचे साथीदार यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी तसेच तात्कालीन मंत्री आमदार धनंजय मुंढे यांना या हत्येप्रकरणी सहआरोपी करून त्यांच्यावर योग्य कारवाही करण्याची मागणी सकल मराठा समाजाच्यावतिने करण्यात आली.संतोष देशमुख यांचा खुन करण्यात आला त्या दिवसापासून ते आजपर्यंत मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना खुन कसा झाला याबाबतची संपुर्ण माहिती होती. तरी देखील धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याला एवढा वेळ लागला. तसेच एक आरोपी अद्याप फरार आहे या सर्व षडयंत्रामागे धनंजय मुंडेचा हात असून त्याला आरोपी करण्यात याव. तसेच आजपर्यंत धनंजय देशमुख यांनी जे जे आरोपी किंवा संशयित असल्याचे सांगीतले आहे त्या सर्वांना आरोपी करण्यात यावे व हा खटला फास्टट्रॅक कोर्टामध्ये चालवून आरोपींना त्वरित फाशी देण्यात यावी, ज्याप्रकारे हे कृत्य करण्यात आले ते फोटो पाहून या सरकारच्या न्याय व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित्त होतो. शहरातील बाजारपेठ बंद ठेवण्यात आले होते.व्यापा-यांनी आपली आस्थापने बंद ठेवून सेलू बंदमध्ये सहभाग नोंदवला सेलू बंद शांततेत पार पडला कूठेही अनूचित प्रकार घडला नाही.मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला .

एम ६

सोनपेठ बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद सोनपेठ - बीड जिल्ह्यातील मस्साजोग चे युवा सरपंच संतोष देशमुख यांची क्रुर हत्या केल्याप्रकरणी शुक्रवार दि.७ रोजी सोनपेठ येथील व्यापाऱ्यांनी आपापली प्रतिष्ठाने बंद ठेवून निषेध व्यक्त . यावेळी संपूर्ण सोनपेठ शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले . समस्त मानव जातीला लाजवेल अशा प्रकारे स्व.संतोष देशमुख यांची अमानवी कृत्य करुन गुंड लोकांनी झुंड करत क्रुर पद्धतीने हत्या केली. या घटनेनंतर महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशभर हळहळ व्यक्त केली जात . त्याचाच एक भाग म्हणून सोनपेठ येथील सर्व पक्ष, संघटना व सर्व समाजाच्या वतीने सोनपेठ शहर बंद ची हाक दिली होती. त्या अनुषंगाने शुक्रवारी शिवाजी महाराज चौक,आठवडी बाजार,विटा रोड,सिरसाळा रोड,शेळगाव रोड,परळी रोड,काबरा मार्केट, डॉ. आंबेडकर चौक, अण्णाभाऊ साठे चौक, टिपू सुलतान चौक,होळकर चौक,जुने पोलीस स्टेशन परिसर, सोनार लेन, मोंढा मार्केट, आदी भागातील व्यापाऱ्यांनी आपापली प्रतिष्ठाने बंद ठेवून निषेध व्यक्त . त्यामुळे शहरात सर्वत्र कडकडीत बंद पहावयास मिळाला.

## सेलूत मागासवर्गीयवस्त्यासाठी झाले धरणे आंदोलन



**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी :** शहरात विकास कामे केवळ उचभ्रू वसाहतीमध्ये करण्यात येत असून मागासवर्गीय वस्त्यामध्ये विकास कामे करण्यात येत नसल्याने असा दूजाभाव करण्यात येत असून मागासवस्त्यामध्ये विकास कामे करण्यात यावे यामागणीसाठी पालिकेसमोर शूक्रवार ७ रोजी धरणे अंदोलन करण्यात आले.

शहरात मागील काही महिन्यापासून विविध विकास कामे करण्यात येत आहेत त्र सदरिल विकास कामे केवळ उचभ्रू वसाहतीमध्ये करण्यात येत आहेत तसेच विकास कामे केवळ काही निवड वसाहतीमध्ये केली जात असून शहरातील मागासवर्गीय वस्त्यामध्ये ही मूलभूत सूविधाची कामे करण्यात यावीत अनेक मागासवस्त्यामध्ये रस्ते,सांडपाण्याची व्यवस्था अशी कामे प्रलंबित आहेत.मात्र याकडे प्रशासन दूर्लक्ष करत आहे.मागासवस्त्यामध्ये तात्काळ मूलभूत सूविधांची कामे करण्यासाठी धरणे अंदोलन करण्यात आले .यासाठी पँथर संघर्ष ग्रूपच्यावतिने रोहन आकात,विनोद धापसे,विकास धापसे,रोहित गायकवाड,सागर गायकवाड , स्वप्निल साळवे,धनंजय जाधव,कपिल धापसे,ऋतिक सावंत आदींनी पूढाकार घेतला होता.

## राज्यस्तरीय कै . वैद्य शंकर दाजी पदे शास्त्री क्रिकेट चषक स्पर्धेत पी डी ए स्पार्टन संघ विजयी

**जिंतूर,/प्रतिनिधी:-.** कोकमत्ठाण येथील आत्मा मलिक क्रिकेट ग्राऊंड स्टेडियमवर नुकत्याच काल पार दाजी पदे शास्त्री क्रिकेट चषक स्पर्धा २०२५ मध्ये पी डी ए स्पार्टन क्रिकेट संघाने अंतिम सामन्यात करुन प्रथम क्रमांक पटकाविला त्यांना रोख एक्कावन हज़ार रुपये व चषक देऊन सन्मानित करण्यात आले

दि २८/२/ २०२५ ते २/३/२०२५ या दरम्यान झालेल्या स्पर्धेत एकुण १२ संघ सहभागी झाले होते त्यापैकी डी ए स्पार्टन क्रिकेट संघाने संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करुन प्रथम क्रमांक पटकाविला व दुसऱ्या तीसरा गेम चेंजर नाशिक आणि समर्थ ११ पिंपरी चिंचवड़ या संघाने चवथा क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. उपस्थित होते.अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाचे केंद्रीय संगठन समितीचे अध्यक्ष आदरणीय गुरुवर्य वैद्य रामदास गुरुवर्य वैद्य अनिल दुबे सर ट आयुर्वेद संमेलन अध्यक्ष आदरणीय गुरुवर्य वैद्य सतीश भट्टड सर या मान्यवरांच्या चषक प्रदान करण्यात आला . प्रथम राज्यस्तरीय डॉक्टर्स क्रिकेट लीग स्पर्धेत विजयी ठरलेला पी डी ए स्पार्टन क्रिकेट सानप उपकर्णधार डॉ. विजय गजभारे आणि टीममधील डॉ किशोर घुगे, डॉ प्रविण शिंदे डॉ सचिन जायभाये डॉ . डॉ गजानान जाधव डॉ. भारत शेळके डॉं. तुषार काबंळे डॉ.रविराज खंदारे डॉ . श्रीनिवास घुगे व डॉ .गंगाधर ढाकरे





पडलेल्या कै . वैद्य शंकर अहिल्यानगर संघाचा पराभव .

परभणी डॉक्टर्स असोसिएशनच्या पी स्थानी अहिल्यानगर ११ संघ तर समारोपीय कार्यक्रमात मंचावर आव्हाड सर, केंद्रीय मंत्री आदरणीय शुभहस्ते विजेत्या संघाना रोख रक्कम व संघाचा कर्णधार*डॉ .शिवप्रसाद गजानन गरूड डॉ . गोविंद वडपुडकर इ सर्व खेळाडूंना सन्मानचिन्ह

देऊन गौरविण्यात आले . या अंतिम सामन्याचा सामनावीर म्हणून डॉ. तुषार कांबळे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैद्य मनोज कोचेटा व वैद्य शिवप्रसाद सानप यांनी आभार मानले . या विजयाबद्दल निमा डॉक्टर्स असोसिएशन परभणी व डॉक्टर्स असोसिएशन जिंतुर व सर्व पत्रकार बधुंनी तसेच श्री कैलासराव घुगे, श्री नामदेव राठोड , श्री शेषराव जाधव , राम राठौर , श्याम राठौर यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे .

## परभणीत मराठवाडा विभागीय कृषि महोत्सवाचे कुलगूरु डॉ.इंद्र मणि यांच्याहस्ते थाटात उदघाटन- शेतकऱ्यांची कार्यक्रमास मोठी उपस्थिती

**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी-** अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा मार्ग, दिंडोरी प्रणित यांच्या वतीने मराठवाडा विभागीय कृषी महोत्सव २०२५ चे आयोजन ७ ते १० मार्च २०२५ दरम्यान प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्टेडियम, परभणी येथे करण्यात आले. या महोत्सवाचे उद्घाटन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ) इन्द्र मणि यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

समारंभास प्रमुख अतिथी म्हणून माननीय खासदार श्री संजयजी जाधव उपस्थित . यावेळी गुरुपुत्र श्री नितीनभाऊ मोरे, गुरुपुत्र, कृषिरत्न श्री आबासाहेब मोरे, आयुक्त श्री धैर्यशील जाधव, आत्मा परभणीचे प्रकल्प संचालक श्री दौलत चव्हाण, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती कविता नावंदे, तसेच सेवा मार्गाचे विभागीय प्रतिनिधी श्री संदीपभाऊ देशमुख, डॉ. गोविंद साळुंके (बीड), माजी नगराध्यक्ष श्री सचिनजी गोरे (परभणी) यांची प्रमुख उपस्थिती होती.

माननीय कुलगुरू प्रा. (डॉ) इन्द्र मणि यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, शेती आणि आध्यात्मिक विश्वास एकत्रितपणे समाजविकासासाठी महत्त्वपूर्ण . अध्यात्माच्या जोडीने विकासाचे कार्य करण्याची ट आणि मराठवाड्याची संस्कृती असून ही बाब प्रसंशनीय . कार्यक्रमाचे आयोजक हे धार्मिक गुरु असून ते राष्ट्र विकास, कृषी विकास यातून समाजाचा विकास सतत साधत . मराठवाड्यात कृषी क्षेत्रातील संशोधन आणि विकासासाठी विद्यापीठ सातत्याने कार्यरत . विशेषतः गोदावरी तुरीच्या वाणाने महाराष्ट्रासह देशपातळीवर लौकिक मिळवला असून, अनेक शेतकरी लखपती बनत . विद्यापीठ शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी 'शेतकरी देवो भव:' या भावनेतून कार्यरत असून, शेतकऱ्यांना दर्जेदार तंत्रज्ञान आणि गुणवत्तापूर्ण बियाणे, रोपे उपलब्ध करून देत . आज (७ मार्च) मराठवाड्यातील चार शेतकऱ्यांचा आणि दोन शास्त्रज्ञांचा राष्ट्रीय पातळीवर उत्तर प्रदेश येथे सन्मान होत आहे, ही अभिमानाची बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले. शेतकऱ्यांसाठी विद्यापीठ दर महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी 'माझा एक दिवस माझ्या बळीराजासोबत' या उपक्रमांतर्गत शास्त्रज्ञांना थेट शेतकऱ्यांशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देत . त्याचप्रमाणे प्रत्येक मंगळवार व शुक्रवार सायंकाळी ऑनलाइन कृषी संवादही आयोजित केला जातो, असे प्रतिपादन त्यांनी केले. ते पुढे म्हणाले की, या संस्थेने केलेले कार्य विद्यापीठाच्या कार्यास पूरक असून विद्यापीठ आपल्या सोबत आहे, अशी ग्वाही दिली. या कार्यक्रमात तज्ञांचे मार्गदर्शन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रदर्शन आयोजित केले याबद्दल आयोजकांचे माननीय कुलागुरुनी अभिनंदन करून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.



या कृषी महोत्सवात विभागीय कृषी प्रदर्शन, पूरक व्यवसाय प्रदर्शन, युवा प्रबोधन, कृषी ढिंढी विज्ञान प्रदर्शन, मराठवाडा कृषी संस्कृती दर्शन, स्वयंचलित यंत्रसामग्री प्रदर्शन, बियाणे व पशुपालन मेळावा, मोफत आरोग्य तपासणी शिबिर यांसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले . यामध्ये मराठवाड्यातील हजारो शेतकरी, कृषी संस्था, संशोधक, विद्यार्थी आणि कृषी उद्योजकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

कार्यक्रमासाठी सेवा मार्गाचे विभाग प्रतिनिधी डॉ. यशवंत राजेभोसले (माजलगाव), श्री संतोषजी ट (छ. संभाजीनगर), श्री विजय कडू ट (अहिल्यानगर), श्री देशमुख (नांदेड), श्री रवी पतंगे (परभणी), श्री. अरविंद काका देशमुख (परभणी), सरपंच श्री रमेश शेरे यांसह हजारो सेवेकरी, शेतकरी आणि भाविक या भव्य दिव्य मराठवाडा कृषी महोत्सवास उपस्थित होते.

# आ. तान्हाजी मुटकुळेंकडून हिंगोली बस स्थानकाची पाहणी

## प्रवाशांना सोयीसुविधा पुरवण्याच्या आ. मुटकुळेंच्या प्रशासनाला सूचना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मार्च**

येथील बस स्थानकात शुक्रवारी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी अचानक भेट देत पाहणी केली. यावेळी प्रवाशांना बसण्यासाठी पुरेशी जागा नाही, पिण्यासाठी पाणी उपलब्ध नाही तसेच अस्वच्छता यामुळे आ. मुटकुळे यांनी आगार प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचारी यांना चांगलेच खडसावत प्रवाशांना सोयीसुविधा पुरवण्याच्या सूचना दिल्या.

हिंगोली बस स्थानकात प्रवाशांसाठी कोणत्याही सोयीसुविधा नसल्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. सध्या उन्हाची तीव्रता वाढत असून याठिकाणी प्रवाशांना पिण्यासाठी पाणीसुध्दा उपलब्ध नाही. त्याअनुषंगाने आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी सुप्रसिध्द कंत्राटदार राम कयाल यांच्याकडे प्रस्ताव ठेवल्यानंतर राम कयाल यांनी येथील बसस्थानकात प्रवाशांना पाणी पिण्यासाठी दोनशे लिटर क्षमतेचे वॉटर कुलर बसविण्याचे नियोजन केले. प्रवाशांना थंड पाणी पिण्यासाठी मिळावे या अनुषंगाने शुक्रवारी बस स्थानक परिसरात पाणपोईचे उद्‌घाटनही आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी कंत्राटदार रामचंद्र कयाल, मयुर कयाल, माजी नगराध्यक्ष जगजीत खुराणा आदींची उपस्थिती होती.

त्यानंतर आ. मुटकुळे यांनी बस स्थानकाची पाहणी केली. यावेळी बस स्थानकात पिण्याचे पाणी नाही, अस्वच्छता तसेच सीसीटीव्ही कॅमेरे असूनही त्याचा काहीही फायदा नाही, सुरक्षा रक्षक आहेत किंवा नाही तसेच प्रवाशांना बसण्यासाठी पुरेशा प्रमाणात खुर्च्या, आसन व्यवस्था नसल्यामुळे अस्वच्छ पायऱ्यावर बसावे लागत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी आगार प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांना पाचारण करीत त्यांना प्रवाशांना आधीच भाडेवाढ सहन करावी लागत असतांना पिण्यासाठी पाणी का उपलब्ध नाही असा सवाल केला. तसेच बसण्यासाठी आसन व्यवस्था नसल्यामुळे तीव्र नाराजी व्यक्त करीत बस स्थानकात आमदार स्थानिक निधीतून आसन व्यवस्थेसाठी निधी देण्याचे आश्वासनही यावेळी आ. मुटकुळे यांनी दिले.




# गोवंश कत्तलीसाठी घेऊन जाणारा पिकअप पोलिसांनी पकडला

## वसमत ते परभणी मार्गावर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मार्च**

वसमत ते परभणी मार्गावर चिखली पाटीजवळ गोवंश कत्तलीसाठी नेणाऱ्या पिकअप वाहनासह चार जनावरे असा सुमारे साडेचार लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी पाच जणांवर हट्टा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, वसमत ते परभणी मार्गावरून एका पिकअप वाहनातून जनावरांची वाहतुक होत असल्याची माहीती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. या माहीतीच्या आधारे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, स्थागुशाचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, जमादार नितीन गोरे, आझम प्यारेवाले, गजानन पोकळे, नरेंद्र साळवे, साईनाथ कंठे, हरिभाऊ गुंजकर, आकाश टापरे यांचय पथकाने वाहनांनी तपासणी सुरू केली. यावेळी पोलिसांनी एक पिकअप थांबवून चालकाकडे चौकशी केली असता चालकाने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यात चार जनावरे दाटीवाटीने कोंबण्यात आल्याचे दिसून आले. पोलिसांनी जनावरे वाहतुकीचा परवाना मागितला असता त्यांच्याकडे कागदपत्रेही आढळून आली नाहीत. त्यामुळे पोलिसांनी पिकअप व चार जनावरे असा साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त करून हट्टा पोलिसांच्या हवाली केला.

याप्रकरणी जमादार नितीन गोरे यांच्या तक्रारीवरून हट्टा पोलिसांनी दिलीप चौधरी, अनंता सातपूते, बाळू दुधमल, सय्यद जावेद, गजानन अडकीणे रा कौठा रोड वसमत यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपनिरीक्षक एस जी केंद्रे पुढील तपास करीत आहेत.

# ग्रामीण युवकांनी औद्योगिक क्षेत्रात चळवळ उभारावी- घुईखेडकर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मार्च**

जिल्ह्यात उद्योग धंद्यात वाढ होण्यासाठी ग्रामीण भागातील युवकांनी एकत्र येत औद्योगिक चळवळ उभी करण्याचे आवाहन रुरल चेंबर्स ऑफ कॉमर्स ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष अतुल घुईखेडकर यांनी केले.

येथील हॉटेल शांतीमध्ये औद्योगिक चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उत्तमराव शिंदे सेंद्रिय शेतीतज्ञ गिरीश देशमुख जिल्हाध्यक्ष, गोविंदराव देशमुख, हिंगोली जिल्हा अध्यक्ष गिरीश देशमुख, चेतन पवार, सुनिल पाटील, देवीदास जाधव, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, संतोष टाले, गजानन मगर आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना घुईखेडकर म्हणाले की ना उद्योग असलेल्या हिंगोली जिल्ह्यांमध्ये उद्योगधंद्यात वाढ करण्यासाठी उद्योग निर्माण व्हावेत. याकरिता या औद्योगिक चचर्चासत्राचे आयोजन करण्यात आले असून येथे राज्यातील विविध क्षेत्रातील उद्योजक व कंपनीचे संचालकांनी मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील नऊ उद्योजकांना घडविण्याचे काम रुरल चेंबर्स ऑफ कॉमर्स ऑफ इंडिया च्या पुढाकाराने होणार आहे उद्योगाबाबत सक्षम मानसिकता निर्माण करणे गरजेचे आहे त्यामुळे ग्रामीण भाग आर्थिक दृष्ट्या कमकुवत होत चाललेला आहे भारताची आर्थिक व्यवस्था ही बहुतांशपणे ग्रामीण भागावर अवलंबून आहे. जोपर्यंत ग्रामीण भागात महात्मा गांधींचे खेड्याकडे चला हे विचार पोहोचणार नाहीत तोपर्यंत भारत सक्षम होणार नाही असा दावा त्यांनी केला. येणाऱ्या काळात नोकऱ्या संपल्या जमा झाल्याचे सांगून भविष्यात सर्वात मोठा बेरोजगारवाद असणार आहे. तेव्हा ग्रामीण भागातही उद्योगाची साधने वाढली पाहिजेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त करून यामध्ये ग्रामीण भागातील महिला बचत गटानाही प्राधान्य देण्याचे आवाहन त्यांनी केले.



**हिंगोली- जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हा परिषदेअंतर्गत महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने अंगणवाडी पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांनी उत्कृष्ट काम केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी अभिवन गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी वाघ आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### शिधापत्रिकाधारकांनी ३१ मार्चपर्यंत ई-केवायसी करून घ्यावी

हिंगोली- राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांसाठी रास्तभाव दुकान स्तरावर ई-केवायसी प्रमाणिकरण प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यामुळे शिधापत्रिकाधारकांनी ३१ मार्चपर्यंत ई केवायसी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्था प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी तसेच त्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी देशात १०० टक्के ई-केवायसी प्रमाणिकरण होणे आवश्यक आहे. सर्व शिधापत्रिका धारकांनी आधार कार्ड, शिधापत्रिका ही कागदपत्रे सोबत घेऊन दि. ३१ मार्च, २०२५ पर्यंत ई-केवायसी करणे बंधनकारक आहे. सर्व पात्र शिधापत्रिकाधारकांनी कुटुंबियांसमवेत शिधापत्रिकेतील व्यक्तींची आधार कार्ड घेऊन त्यांचे सत्यापन (व्हेरिफिकेशन) करून घेणे सक्तीचे आहे. सत्यापन (व्हेरिफिकेशन) न झालेल्यांची नावे शिधापत्रिकेमधून वगळल्यास किंवा त्यांचे शिधा जिन्नस बंद झाल्यास सर्वस्वी जबाबदारी शिधा पत्रिका धारकाची राहील, याची नोंद घ्यावी. ई-केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी राष्ट्रीय सूचना केंद्र, नवी दिल्ली यांनी मेरा के-वायसी मोबाईल अप्लिकेशन विकसित केले आहे. त्यामुळे लाभार्थी स्वतःच्या मोबाईल मधून केवायसी पूर्ण करू शकणार आहेत. ही मोबाईल प्रणाली राज्यात कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत ज्या लाभार्थ्यांनी रास्तभाव दुकानांमध्ये जाऊन ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नाही त्यांनी मेरा-केवायसी मोबाईल प्रणालीद्वारे ई-केवायसी पूर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार, हिंगोली यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### आदर्शमध्ये महिला दिनानिमित्त राष्ट्रीय परिषद

हिंगोली- येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्रधानमंत्री उच्चस्तर शिक्षा अभियान पुरस्कृत समाजशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि ८ मार्च २०२५ रोज शनिवारला लैंगिक समानता, घरगुती हिंसाचार आणि महिला सक्षमीकरण या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे. सदरील परिषदेचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य प्रो.डॉ.विलास आघाव हे उपस्थित राहणार आहेत. उद्‌घाटक म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथील प्र. कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन उपस्थित राहणार आहेत. प्रमुख बीजभाषक म्हणून धर्मशास्त्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ जबलपूर (म.प्र.) येथील डॉ. दीपलक्ष्मी चिले हे उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रो. डॉ. एस. पी. घायाळ, सामाजिक शास्त्रे संकुलचे संचालक प्रो. डॉ. घनश्याम येळणे, विद्या परिषदेचे सदस्य प्रो. डॉ. नारायण कांबळे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. सदरील एकदिवशीय राष्ट्रीय परिषदेला विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवून आपले शोध निबंध सादर करावेत असे आवाहन प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांनी केले आहे. सदरील सेमिनारच्या यशस्वी महाविद्यालयातील संबंधीत प्राध्यापक, कर्मचारी परिश्रम करीत आहेत.

# भारत सरकारतर्फे पुष्यमित्र जोशीची राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मार्च**

जिल्ह्यातील तरुण संशोधक, उत्कृष्ट वक्ता आणि धोरण सल्लागार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुष्यमित्र जोशीची भारत सरकारच्या प्रतिष्ठित राष्ट्रीय युवा पुरस्कारासाठी निवड झाली आहे. युवक कल्याण आणि क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान केला जातो. हिंगोलीच्या इतिहासात प्रथमच पुष्यमित्र जोशीच्या रूपात राष्ट्रीय पुरस्कार जिल्ह्यातील नागरिकाला प्राप्त होत आहे. त्याच्या या ऐतिहासिक यशामुळे संपूर्ण हिंगोलीत अभिमानाचे वातावरण आहे.

राष्ट्रीय युवा पुरस्कार देशातील युवकांसाठी सर्वोच्च सन्मान मानल्या जातो. देशात १५ ते २९ वर्ष वयोगटात विज्ञान, समाजसेवा, नवोपक्रम, नेतृत्व, संशोधन आणि धोरण आदी क्षेत्रांमध्ये असाधारण कार्य करणाऱ्या युवा व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. पुष्यमित्र जोशीचे विज्ञान-तंत्रज्ञान, पर्यावरणीय धोरण, सामाजिक कार्य आणि सार्वजनिक प्रशासनातील मोलाचे योगदान लक्षात घेऊन त्याची निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत नवी दिल्ली येथे आयोजित विशेष कार्यक्रमात प्रदान केला जाणार आहे.

पुष्यमित्र जोशी हा संशोधक, नवोपक्रमकर्ता, लेखक आणि धोरण सल्लागार म्हणून सुपरिचित आहे. त्याच्या विज्ञान आणि समाजसेवा यांचे एकत्रित संशोधनात्मक कार्य समाजपरिवर्तनासाठी उपयुक्त ठरत आहे. त्याच्या तीन संशोधनांना भारत सरकारकडून पेटंट मान्यता मिळाली आहे. त्यानी आपल्या संशोधनाद्वारे पेटंट प्राप्त डिस्पोजमित्र उपकरणात कोविड-१९ काळात वापरून झालेल्या मास्कची सुरक्षित विल्हेवाट लावली. त्या काळातच सॅनिटायझरची बाजारात कमतरता निर्माण झालेली असताना, जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार त्यानी स्वतःच सॅनिटायझर तयार करून गरजू लोकांना विनामूल्य वितरित केले. त्याचसोबत रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी त्यांनी इम्युनो बूस्टर तयार करून हजारो लोकांना मोफत वाटप केले होते.

भारताच्या २३० हून अधिक जिल्ह्यांमध्ये पाण्यात फ्लुराईडचे प्रमाण जास्त असल्यामुळे १० पेक्षा अधिक गंभीर आजार होतात. या समस्येवर उपाय म्हणून पुष्यमित्रनी ॲक्वामित्र हे पेटंटप्राप्त संशोधन विकसित केले आहे. हे संशोधन अतिशय कमी खर्चात आणि कोणत्याही उर्जेशिवाय पाण्यातील फ्लुराईड कमी करण्यास मदत करते, त्यामुळे दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांना याचा मोठा फायदा होणार आहे.

पुष्यमित्र जोशीनी विज्ञान, पर्यावरण आणि जीवनशास्त्र यासंबंधी तीन शैक्षणिक पुस्तके लिहिली असून, ती विद्यापीठांच्या अभ्यासक्रमातदेखील समाविष्ट आहेत. त्याचे २० हून अधिक आंतरराष्ट्रीय संशोधन पेपर जगभरातील विविध जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहेत. ऐतिहासिक आणि राजकीय विषयांवर त्याचे अनेक लेख प्रसिद्ध आहेत. भारताच्या महान इतिहासाची विद्यार्थ्यांना ओळख करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्यदेखील त्याने केले आहे.

त्यानी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक महत्त्वाच्या व्यासपीठांवर भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. ब्रिक्स संघटनेच्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम कार्यसमूहात भारताचे प्रतिनिधित्व पुष्यमित्रने केले आहे. स्टार्टअप आणि सामाजिक प्रभाव यावर भर देणाऱ्या जागृती जी २० यात्रेमध्ये त्यानी 'बिझ ज्ञान ट्री' स्पर्धेचे विजेतेपद मिळवले आहे. त्यानी नुकत्याच संपन्न झालेल्या राष्ट्रीय युवा महोत्सवात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते. त्यानी विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार जिंकले असून, त्याच्या संशोधनासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांकडून 'अविष्कार' संशोधन फेलोशिपनेही सन्मानित करण्यात आले होते. त्यानी महाराष्ट्र स्टार्टअप यात्रा, महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज, स्वच्छ तंत्रज्ञान स्पर्धा आणि अविष्कार वैज्ञानिक संमेलन अशा अनेक प्रतिष्ठित वैज्ञानिक स्पर्धांमध्ये विजय मिळवला आहे. त्याची प्रतिष्ठित इंडियन सायन्स काँग्रेसच्या सायन्स कम्युनिकेटर म्हणून निवड करण्यात आली होती.

पुष्यमित्रच्या रूपात प्रथमच हिंगोलीच्या मातीतील युवकाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. त्याच्या या अभूतपूर्व यशामुळे संपूर्ण महाराष्ट्र आणि हिंगोली जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे.

# औंढा नागनाथ येथे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मार्चे**




राष्ट्रीय आरोग्य अभियान व केंद्र शासनाच्या महत्त्वपूर्ण बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या विशेष मोहिमेचे उद्घाटन ०१ मार्च रोजी राज्याचे करण्यात आले. औंढा नागनाथ येथील नागेश्वर प्राथमिक विद्यालय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

याप्रसंगी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.नितीन तडस, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.कैलास शेळके, डॉ.मंगेश टेहरे, डॉ.गोपाल कदम, डॉ.शैलजा कुपस्वामी, डॉ. पांडुरंग फोपसे आर बी एस के जिल्हास्तरीय परीक्षा लक्ष्मण गाभणे, चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली औंढा नागनाथ येथील नागेश्वर प्राथमिक विद्यालयात तालुकास्तरीय उद्घाटन करण्यात आले.

यावेळी नागेश्वर प्राथमिक विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांची सखोल आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी एकूण ४६६ पैकी ४५८ बालके तपासण्यात आले. किरकोळ आजारी असलेल्या विद्यार्थ्यांना औषधोपचार करण्यातआले.तसेच गंभीर आजार असणाऱ्या बालकांना पुढील उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय औंढा नागनाथ व जिल्हा रुग्णालय हिंगोली येथे संदर्भित करण्यात आले.या कार्यक्रमासाठी औंढा नागनाथ ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. कल्पना सुनतकरी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गजानन चव्हाण, गटशिक्षणाधिकारी गंगाधर साखरे, बालविकास प्रकल्प अधिकारी संगीता इंगळे, ग्रामीण रुग्णालयाचे अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक इंगळे व सर्व शिक्षक वृंद व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला. विशेष तपासणी मोहीम मार्च महिनाभर राबविण्यात येणार असून या मोहिमेत शालेय व अंगणवाडी मधील बालकांची आरोग्य तपासणी केली जाणार आहे.

# जीव धोक्यात घालून वाहन चालकांचा पूलाजवळून प्रवास



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ मार्च**

शहरातील अंबिका टॉकीजजवळ पुलाचे बांधकाम करण्यात येत आहे. त्यामुळे हा रस्ता बंद असूनही या परिसरातील नागरिकांना जवळचा दुसरा पर्यायी रस्ता नसल्यामुळे जीव धोक्यात घालून वाहने नेतांना दिसत आहेत. पुलावरून जातांना वाहन चालकांचा थोडाही तोल गेला तर अपघात होण्याची दाट शक्यता आहे. हमालवाडी, सिध्दार्थ नगर, जवळा पळशीकडे जाणारे लोक यांना अंबिका टॉकीज जवळील याच पुलावरून जावे लागते परंतु सध्या या पुलाचे काम सुरू असून पुलाच्या बाजूने वाहन चालक त्यांची वाहने जीव धोक्यात घालून नेत आहेत. सदरील रस्ता वाहतुकीस बंद न केल्यास अपघात होण्याची दाट शक्यता आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com





## बीड जिल्हा पोलिस दलाच्या वतीने जनजागृती बाईक रॅली

**बीड जिल्हा पोलिस दलाच्या वतीने महिला दिनानिमित्त शुक्रवारी बीड शहरात बेटी बचाओ बेटी पढाओ जनजागृतीनिमित्त छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथून बाईक रॅलीला हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करतांना जिल्हा पोलिस अधीक्षक नवनित कॉवत, अप्पर पोलिस सचिन पांडकर यांच्यासह अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# शेतकऱ्यांना चारा लागवडीसाठी हजार हेक्टर जमिनीस प्रशासकीय मान्यता द्यावी

**वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष अ‍ॅड.निलेश हेलोंडे पाटील यांच्या सूचना**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ मार्च**

शेतकरी स्वावलंबन योजनेअंतर्गत जिल्ह्यात गायरान जमिनीवर जाळा लागवडीसाठी हजार हेक्टर वर आहे याला प्रशासकीय मान्यता देण्यात यावी अशा सूचना स्वर्गीय वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड.निलेश हेलोंडे पाटील यांनी एका बैठकीत दिल्या.

आपल्या बीड जिल्ह्याच्या दौऱ्यात या बैठकीत बीड तालुक्यातील पिंपळवाडी मधील मयत शेतकरी दादाराव बहिरवाळ यांच्या वारसांना त्यांनी यावेळी भेट दिली.

सर्व शेतकऱ्यांना मदत व्हावी या दृष्टिकोनातून प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या कंपनी व प्रतिनिधीचे नाव आणि मोबाईल प्रत्येक ग्रामपंचायतीत फ्लेक्स द्वारे लावावा अशी सूचना त्यांनी या बैठकीत केली.

विदर्भ व मराठवाडा विभागातील शेतक-यांच्या आत्महत्या प्रकरणांची दखल घेऊन त्यावर तातडीची उपाययोजना करण्यासाठी व शेतक-यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे अशा उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची शासनाने नियुक्ती केलेली आहे. या अनुषंगाने कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड निलेश हेलोंडे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मिशनसंबंधी जिल्हास्तरीय आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे संपन्न झाली.

या बैठकीस जिल्हाधिकारी अविनाश पाठक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख, जिल्हा कृषी अधिकारी विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.सदर बैठकीत अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले.

उपजिल्हाधिकारी रोहयो, बीड यांनी गायरान जमिनीवर चारा लागवड करणेकामी १००० हेक्टरवर लागवड करण्यासाठी प्रशासकीय मान्यता द्यावी.

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजना कंपनीच्या प्रतिनिधीचे नाव व मोबाईल क्रं. ग्रामपंचायत स्तरावर प्रसिध्द करण्यासाठी जिल्हयातील सर्व १०६५ ग्रामपंचायतींमध्ये प्रतिनिधींची नावे / सूचना डिजिटल फ्लेक्स स्वरुपात लावावेत.जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांनी शेतीच्या बांधावर जैविक प्रयोगशाळेची उभारणी करण्यासाठी मौ. खामगाव ता. गेवराई व डिघोळअंबा ता. अंबाजोगाई या ठिकाणी प्रत्येकी १० कॅम्प आयोजित करुन ५०० मास्टर ट्रेनर्स तयार करावेत.प्रेरणा प्रकल्पांतर्गत आरोग्य कर्मचारी यांनी घरोघरी जाऊन माहिती द्यावी. व आत्महत्याग्रस्त शेतक-यांचे कुटुंबियांना भेटी देण्यात याव्यात. व त्यांचे मानसिक



स्वास्थ्याची काळजी घेणेबाबत निर्देश दिले.

सर्व कृषी उत्पन्न बाजार समितींच्या व सर्व ग्रामपंचायतींच्या नोटीस बोर्डवर शेतीमालाचा भावफलक लावण्यात यावा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांनी शेतीमालाच्या आधारभूत किंमती बाबत व्यापक प्रसिध्दी द्यावी.सहआयुक्त, कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता व नाविण्यता विभाग, बीड यांनी त्यांच्या विभागाच्या योजना तरुणाईला माहिती नसल्याने पुरेशी प्रसिध्दीद्वारे माहिती करुन द्याव्यात. सदर योजनेच्या माध्यमातून लाभ मिळेल असा प्रयत्न करण्यात यावा. शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद बीड यांनी शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या वारसांना स्पर्धा परीक्षेसाठी पुस्तके / वाचनालय उपलब्ध करुन द्यावे. मैदानी खेळांसाठी जिल्हा नियोजन समितीचा निधी वापरुन जिल्हयात किमान २५ मैदाने तयार करावीत. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांच्याकडे २२८ अर्ज प्राप्त झालेले असून, त्यामध्ये बँकेने ३५टक्के सबसिडी दिलेली आहे. तसेच ९९ अर्ज मंजूर केलेले आहेत. उर्वरीत प्रलंबित अर्जावर विनाविलंब कार्यवाही करावी.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांनी महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ अंतर्गत कलम १८ अन्वये सावकारकीमध्ये सावकारांनी बळकावलेली (रजीस्ट्री करुन घेतलेली) १८ प्रकरणात २३.७७ हे. आर. जमिन शेतक-यांना परत केली असल्याचे सांगितले. त्याबद्दल त्यांचे अध्यक्ष यांनी अभिनंदन केले. व उर्वरीत प्रकरणांमध्ये ३ महिन्यात निर्णय घेण्याचे सूचित केले. विभागीय वन अधिकारी यांनी वन्य प्राण्यांपासून शेतक-यांचे नुकसानीमुळे मोबदला मिळण्यासाठी ज्या क्षेत्रात वन्यजीव जास्त आहेत त्या ठिकाणी वन विभागाच्या योजनेबाबत जनजागृती करावी. आष्टी, पाटोदा, धारुर व वडवणी या तालुक्यांमध्ये जास्त वनक्षेत्र असून, तेथील व जिल्हयातील नागरिकांना जास्तीत जास्त योजनांचा लाभ देण्यात यावा.

जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांनी अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत शेतक-यांना एप्रिल २०२३ पासून १५० रु. प्रमाणे एकूण ४९१२४ शिधापत्रिकाधारकांना २६ कोटी ९२ लक्ष रुपयांचे वाटप केलेले असल्याचे सांगितले. विस्तार अधिकारी कृषी जिल्हा परिषद बीड यांच्या कार्यालयामार्फत शेतक-यांसंबंधी आदिवासी विभागाच्या योजनेत २ शेतक-यांना लाभ देण्यात आला असल्याचे सांगितले. रेशीम विकास अधिकारी, बीड यांनी मागील वर्षी १२१६ मे.टन उत्पादन तसेच यावर्षी ५७०० एकरवर लागवड केलेली असल्याचे सांगितले. यासंबंधाने अध्यक्ष यांनी दि.०७.०७.२०२४ चा शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत निर्देश दिले. वरीलप्रमाणे शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणेबाबत निर्देशही कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड निलेश हेलोंडे यांनी दिले.

पक्षुच्या चाऱ्यासंबधी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी पीपीटीव्दारे माहिती सादर केली तर कार्यक्रमाचे अभार प्रदर्शन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले.

## दिव्यांग लाभार्थ्यांनी लकी ड्रॉ साठी उपस्थित राहण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ मार्च**

जिल्ह्यातील सर्व दिव्यांग बंधू लाभार्थ्यांना सन २०२४-२५ मधील जिल्हा परिषदेचे स्व.उत्पन्न ५ टक्के दिव्यांग कल्याणार्थ राखीव निधी मधून अस्तिव्यंग प्रवर्गीय दिव्यांगाना मोफत तीन चाकी स्कूटर ( विथ डप्टरचा ) पुरवठा करण्याची राबविण्यात आलेली आहे. सदर योजनेच्या अनुषंगाने पंचायत समिती कार्यालयामार्फत अर्जाची मागणी करण्यात आलेली होती. सदर बाबतची खालीलप्रमाणे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

बीड- १७४ अर्ज, परळी-६६ धारुर- ४७, अर्ज वडवणी- ५०, केज- ५५, शिरूर कासार- ८९, आष्टी-१६०, माजलगाव-१५७, गेवराई- ३७१, अंबाजोगाई- १११ आणि पाटोदा ४८ अर्ज प्राप्त झाले असून ५४ दिव्यांग लाभार्थ्यांना तीन चाकी स्कूटरचा पाठपुरवठा करायचा आहे सदर ५४ उद्दिष्ट दिव्यांग सर्वेक्षण २०२५ नुसार त्या त्या तालुक्यातील अस्थिभंग प्रवर्गाच्या संख्येच्या प्रमाणात खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे.

वरील प्रमाणे १३२८ अर्ज प्राप्त झाले असून एकूण ५४ दिव्यांग बांधवाना तीन चाकी विथ डप्टरचा पुरवठा करावयाचा असून सदर ५४ उदिष्ट दिव्यांग सव्हेंक्षण २०२५ नूसार त्या त्या तालुक्यातील अस्थिव्यंग प्रवर्गाच्या प्रमाणात खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे.बीड- ९, परळी-४,धारूर-२ वडवणी-२, केज-५, शिरूर कासार- ४, आष्टी-६, माजलगाव- ४, गेवराई- ८, अंबाजोगाई-८ आणि पाटोदा- २ असे एकूण ५४ अर्ज. अर्जाची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे निर्धारित उद्दिष्टनुसार पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याच्या अनुषंगाने दि. ८ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड येथे लकी ड्रॉ चे आयोजन करण्यात आले आहे. सदर लकी ड्रॉ इन कॅमेरा व सर्व दिव्यांग लाभार्थ्या समक्ष करण्यात येणार असून सर्व अर्जदार यांनी लकी ड्रॉ साठी उपस्थित राहावे असे जिल्हा समाज कल्याणच्या समाज कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी विशेष रोजगार मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ मार्च**

बीड जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना स्थानिक ठिकाणी रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी याकरिता कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, बीड मार्फत दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी स्वा.सावरकर महाविद्यालय सावरकर नगर नेत्रधाम हॉस्पीटल शेजारी, जालना रोड बीड येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सदर मेळाव्यामध्ये पुढिलप्रमाणे नामांकित कंपनीच्या वतीने बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी मिळावी याकरिता मुलाखती घेण्यात येणार आहेत.

गुरुकुल इंगलिश स्कुल बीड, येथे प्राथमिक शिक्षक एकूण पदे- २० शैक्षणिक पात्रता- डी.एड./ बी.एड (इंग्रजी) वयोमर्यादा-२५ ते ३५ जॉब लोकेशन- बीड.एल. आय. सी बीड, विमा सखी एकूण पदे ५० शैक्षणिक पात्रता- १० वी किंवा १२ वी वयोमर्यादा-१८ ते ४५ जॉब लोकेशन-बीड जिनिअस इंगलिश स्कुल, बीड येथे व्हाईस प्रिनसिपल एकुण पदे ०१ शैक्षणिक पात्रता- ग्रॅज्युएट,बी.एड अनुभव ५ वर्षे अकांउट/क्लार्क एकुण पदे ०२ शैक्षणिक पात्रता- बी.कॉम/एम.कॉम/टॅली अनुभव २ वर्षे प्राथमिक शिक्षक- एकुण पदे ११ शैक्षणिक पात्रता- डी.एड./बी.एड (इंग्रजी) वयोमर्यादा-२५ ते ३५,समर्थ नर्सिंग स्कुल, बीड येथे प्राचार्य, एकुण पदे-०१ शैक्षणिक पात्रता- बी.एस.सी नर्सिंग वयोमर्यादा १८ ते ३० टयुटर, एकुण पदे-०९ शैक्षणिक पात्रता-बी.एस.सी नर्सिंग वयोमर्यादा १८ ते ३०, अकाउटंट/क्लार्क- एकुण पदे- ०२ शैक्षणिक पात्रता-बी.कॉम/ एम.कॉम/टॅली वयोमर्यादा १८ ते ३०,एस.जी.सॉप्टवेअर सोल्युशन, मार्केट डेव्हलपमेंट ऑफिसर, एकुण पदे-१० शैक्षणिक पात्रता- १२ वी/पदवी वयोमर्यादा १८ते ३० धुत ट्रान्समिशन छ.संभाजी नगर, ट्रेनी इंजिनिअर, एकुण पदे- ७० शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन मेक.इंजिनिअरिंग डिप्लोमा इन इले.इंजिनिअरिंग वयोमर्यादा- १८ते २४

जॉब लोकेशन- छ संभाजीनगर ग्रिव्हज कॉटन छ.संभाजी नगर येथे ट्रेनी इंजिनिअर, एकुण पदे-७५ शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन मेक.इंजिनिअरिंग डिप्लोमा इन इले.इंजिनिअरिंग वयोमर्यादा- १८ते २४ जॉब लोकेशन- छ संभाजीनगर

क्रेडिट क्सेस नागपुर, येथे केंद्र मॅनेजर- , एकुण पदे -५० शैक्षणिक पात्रता-१२ वी/पदवी वयोमर्यादा १८ते ३० जॉब लोकेशन- अहिल्यानगर / पुणे टॅलेनसेतु सर्विसेस, पुणे येथे ट्रेनी एकुण पदे -५० शैक्षणिक पात्रता १० वी/१२ वी/आय.टी.आय/ डिप्लोमा वयोमर्यादा १८ते ३० जॉब लोकेशन- अहिल्यानगर / पुणे शिवशक्ती ग्रीटेक,बीड येथे सेल्स रिप्रजेन्टेटिव्ह एकुण पदे १५ शैक्षणिक पात्रता १० वी/ पदवी/ कृषी पदविका वयोमर्यादा १८ते २२

जॉब लोकेशन- बीड दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी स्वा.सावरकर महाविद्यालय, सावरकर नगर, नेत्रधाम हॉस्पीटल शेजारी जालना रोड बीड. येथे प्रत्यक्ष येऊन संधीचा लाभ घ्यावा. रोजगार मेळाव्यास येताना आवश्यक कागदपत्रे सोबत आणावी. या बाबत काही अडचणी असल्यास श्री. जयदत्त इंगोले यांना ९८२२७८१८७६ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा तसेच Beed Skill या फेसबुक पेजला फॉलो व लाईक करावे असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सुशिल उचले यांनी केले आहे.

# कैलास बोराडे यांना लोखंडी रॉड गरम करून अंगाला चटके देणाऱ्या गाव गुंडावर मकोका सारखा गुन्हा नोंद करावा

### मारहाण प्रकरणी तहसीलदार यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ मार्च**

भोकरदन तालुक्यातील अन्वा येथील कैलास गोविंद बोराडे यांना झालेली अमानुष मारहाण व जिवे मारण्याचा प्रयत्न ही घटना पुरोगामी महाराष्ट्राला व मानवतेला काळीमा फासणारी आहे. या घटनेतील सर्व आरोपींना तात्काळ पकडून त्यांच्यावर मकोका सारखा गुन्हा नोंद करुन आरोपीस तात्काळ अटक करावी. अन्यथा जनआंदोलन उभारण्यात येईल असा इशारा असलेले लेखी निवेदन कैकाडी महासंघाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मणराव गायकवाड, आझाद क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष राजेश घोडे, माझी जि प सदस्य प्रा. प्रकाश गवते, माजी समाज कल्याण सभापती कल्याणराव आबूज, माजी सरपंच ज्ञानेश्वर सरवदे , वंचित बहुजन आघाडीचे नेते धम्मानंद साळवे ,अविनाश कांडुरे, मल्हार सेनेचे कार्याध्यक्ष अशोकराव डोणे, ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने, संतोष देवकते, प्रभाकर धरपडे, अशोक ढगे, दत्ता येवले, नंदकुमार सजगणे, अनिल हिवरकर, रासपचे तालुकाध्यक्ष मुक्तीराम आबूज, दत्ता सातपुते, भाई विष्णु शेळके , व सकल ओबीसी समाज यांनी तहसीलदार यांना दिले आहे.

८ मार्च महिलादिनानिमित्त

## प्रेरणा व एकाकीने फुलली माझी कविता स्व:अनुभव

साहीत्य वाचन, लिखाण यापासून मी कोसोदूर होते. ग्रामीण भागात जेमतेम हजार लोकांच्या वस्तीत माझा जन्म झाला. माहेरी असतांना जेमतेम शिक्षण व घरातून बाहेर पडण्यास मज्जाव त्यामुळे बाहेरचे जग काय असते, व्यवहार काय असतो याची तसुभरही कल्पना मला त्यावेळी नव्हती. गोषा पध्दत म्हणायला हरकत नाही. अशा घरात आम्ही पाच बहिन भांवड वाढलो. त्यात माझ्याबाबतीत सर्वाचाचा डावा विचार असल्याने मी फारशी लाडाकौडात न वाढता नकोशी प्रमाणेच माझे बालपण गेले.

तशी लहानपणापासूनच मला वाचनाची भारी आवड आई वडील हे ग्रामीण भागातील, जरा बुरसटलेल्या विचाराचे असल्याने माझी शिक्षणाची आवड मात्र मनातल्या मनातच मुरल्या गेली त्याला उच्च शिक्षणाचे धुमारे मात्र फुटलेच नाही. वडील जुन्या काळातील चौथी शिकलेले अशिक्षित आई यामुळे घरात जी वाचन संस्कृती हवी ती कधीच मिळाली नाही. वाचन लिखाणाचा गंधही नसल्याने माझे शिक्षण फक्त चौथीपर्यंत झाले व काही काळापुरते तरी शिक्षणाचे दरवाजे माझ्यासाठी बंद झाले शिक्षणाची उर्मी उरात दाटुन यायची पण आई वडिलांच्या कडक शिस्तीमुळे तोंडातुन ब्र काढण्याचा अधिकार नव्हता.गावात चौथीपर्यंत शाळा पण या शाळेचा उबंरा मी चौथीनंतर ओलांडला नाही. सा-या मास्तरांचे माझ्या वडीलाच्या किराणा दुकानात खाते असल्याने ते मला फक्त पुढील वर्गात ढकलायचे. क, का, की, कशी आहे याची मला अक्षर ओळखही नव्हती. चौथीला मात्र बोर्डाची परिक्षा असल्याने वाघ नावाचे मास्तर खूप कडक आले त्यांनी सांगितले शाळेत आल्याशिवाय हजरी लागणार नाही. तेव्हा मला या अक्षरांची मोडकी तोडकी ओळख झाली आणि मला ढकलपास करण्यात आले.

मला वाचता येत नसले तरी अडखळत का होईना वडिलांच्या घरी किराणा दुकान असल्याने काही रद्दीमध्ये पेपर यायचे त्यातील वृत्तपत्र मी काढून वाचायची पण लिहीता मात्र येत नव्हते. कधी कधी आईला मोडक्या तोडक्या शब्दात बातम्या वाचून दाखवाचे तर कधी कामाच्या वेळेत पेपर वाचत बसले तर आई घर डोक्यावर घेऊन पेपर हिसकावून घ्यायची व म्हणायची मोठी कलेक्टर होणार कांग जा शेण जमा करुन आण पावसाळा जवळ आला चुलीसाठी जळतन होईल. ती खूप रागवायची कधी मारही खावा लागायचा तरीही मी चोरून वृत्तपत्र वाचायची.

ही परिस्थिती जास्त काळ टिकली नाही लहानपणीच माझे लग्न झाले वाटले होते इकडे तरी शिक्षणाची संधी मिळेल पण सासरी तर यापेक्षाही वेगळेच वातावरण होते. सासरी आल्यवर वाटायचे पुढील शिक्षण घ्यावे, वृत्तपत्रे, मासिके वाचावे असे खूप वाटायचे पण घरात नकळखत चुकून जरी कधी हातात एखादे वृत्तपत्र दिसले तर पतिराज खूप संतापायंचे, प नको ते टोचून बोलायचे नाही ऐकले तर सांगायचे बायकांनी पुस्तके पेपर मासिके असे काही वाचू नये, शिक्षण घेऊ नये, यामुळे बायका बिघडतात, नव-याच्या डोक्यावर मिरे वाटतात.

मी मात्र मनातील इच्छा दडपून टाकायची. गप्पा मारण्यात टाईमपास करायचे. जे स्वतःला आवडायचे नाही ते मात्र मन मारुन करावे लागायचे पण माणसाच्या




भविष्यात पुढे काय वाढून ठेवले हे मात्र कुणाला कळत नाही. कालचक्राच्या लाटेने सौम्य धक्का दिला आणि माझ्या सोबतचे एक रथाचे चाक अचानक निखळून पडले. कधीही घराचा उबंरठा न ओलंडणारी समाजाच्या भरल्याबाजारात पाय रोवून लढण्यासाठी सिध्द झाली. नाविलाजाने वास्तवात मन मारत, सामाजिक बाजारात कधी भीतीने, कधी लाजेने, कधी दबावाने वागू लागले नको त्या कडू-गोड आठवणी चे घोट पीत, मात्र मग माझे जगणे सुरु झाले लढा माझा एकटीचा नव्हता. घरात असलेल्या कुटुंबाचाही होता.

अन् मनात जी कोंडून राहिलेली शिक्षणची इच्छा मी नोकरी करत-करत माझे शिक्षण चालू ठेवले. अशातच दीपावलीसाठी मी माझ्या सहका-यांना ग्रीटिंग कार्ड न घेता माझ्या स्वहस्ते काव्यरूपी शुभेच्छा लिहून पाठविल्या आणि ती कविता त्यांना खूप खूप आवडली, त्यांनी ही पाठीवर दिलेली थाप होती.मला स्वाक्षरीही करता येत नव्हती. त्यांनी प्रोत्साहन दिले तु खूप छान कविता लिहू शकते, तुझी भाषा शैली ही खूप चांगली आहे. तू काहीतरी लिहीत रहा, मनही मोकळे होईल आणि एक वेगळाच आनंद तुला मिळेल. खूप बरे वाटले.खूप आनंद वाटला आणि मी क्षणभर डोळे विचार बंद करुन विचार केला खरंच मी काही इतके चांगले लिहू शकेल का? पण जी शाब्बासकीची थाप माझ्या पाठीवर होती त्यामुळे मी पेन आणि कागद घेऊन लिहायला सुरुवात केली आणि एकेक करून अश्या ब-याच कविता मी लिहून काढल्या.

कविता लिहिणे विरंगुळ्याचे साधन झाले यापासून अबोली वृत्ती असल्यने लिहायला खूप आवडायचे, चार बायका मध्ये बसून उणीदुणी काढणे मला कधीच जमले नाही. मग करमणूक म्हणून मी हा छंद जोपासला माझी पहिली कविता नांदेड येथील दैनिक महासागर मध्ये छापून आली तेव्हा माझा माझ्यावर विश्वासच बसेना. अशा दररोज कविता मी संपादकांना दिल्या ते छापत राहिले नंतर दैनिक प्रजावाणी, दैनिक श्रमिक एकजू,ट दैनिक सत्यप्रभा, दैनिक देशोन्नती, दैनिक रिपब्लिकन गार्ड, साप्ताहिक कंधार वार्ता असे बरेच दैनिक, साप्ताहिकात, दिवाळी अंकात मासिकात, पाक्षिकात या सर्व अंकात माझे साहित्य प्रकाशित झाले. पत्रकारांनाही तुम्ही चांगले लिहिता म्हणून शुभेच्छा दिल्या या सर्व पत्रकारांनी, रसिकांनी मला प्रेरणा दिली. वृत्तपत्रातील कविता वाचून बरेच पत्र मला येऊ लागली. तुमचा काव्यसंग्रह आहे का, असेल तर पाठवून द्या म्हणून विचारू लागले आणि मग वाटू लागले आपला काव्यसंग्रह असायला हवा. मग पुस्तक काढण्याची धडपड सुरू झाली. अशा आकांक्षांना नवी पालवी फुटू लागली, काव्यसंग्रहाला साकार करणाऱ्या परिचित-अपरिचित सहकाऱ्यांनी प्रेरणा दिली, दिवसभर वृत्तपत्रात रेंगाळणाऱ्या हातात लेखणीची शब्दरूपी साथ मिळाली आणि कसलाही विचार न करता त्या कविता वाचण्यासारखा आहे की नाही, कोणाचे मार्गदर्शन नसतानाही 'मनीषा' काव्यसंग्रह काढण्याचा संकल्प केला आणि तो इतक्या घाईगडबडीत आमचे स्व.लाडके आमदार प्रकाशभाऊ खेडकर, माजी कुलगुरू शेषराव सूर्यवंशी, यांच्या हस्ते काव्यसंग्रह प्रकाशित झाला. मी माझ्या सहकाऱ्यांचे, संपादक, प्रतिनिधी, नांदेड परभणी आकाशवाणीचे अधिकारी, कर्मचारी यांनी माझ्या कविता प्रकाशित करून संधी दिली, त्यांचे आभार व्यक्त करू शकले नाही. या काव्यसंग्रहाला कळत-नकळत सगळ्यांची प्रेरणा मिळाली आणि या काव्यरूपी रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले. मनीषा काव्यसंग्रहात एकूण ५४ कविता असून मान्यवर व्यक्तींचे प्रस्तावना नाही पण अनेक पुरस्कार पुस्तकाला मिळाले आणि जोखडात अडकलेल्या स्त्रीचे मनीषा काव्यसंग्रह वाचकाच्या हाती दिल्याने मोकळे आकाश भरारी घेण्यासाठी खुले खुले वाटू लागले.

आजमितीला माझा १ काव्यसंग्रह २ कथासंग्रह २ ललितलेख संग्रह प्रकाशित झाले असून २ पुस्तके प्रकाशनाच्य वाटेवर आहे. अनेकांच्या प्रेरणा अन् माझी मुलगी मनिषा हिचे सहकार्य, एकाकी स्वाभावामुळे माझी कविता फुलत गेली.

**बेबीसरोज अंबिलवादे,**
जिल्हा माहिती कार्यालय,बीड
चलभाषा क्र.९९२११३६१८५